जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# शांघाई येथे आयोजित जागतिक कौशल्य स्पर्धा २०२६ साठी ३० सप्टेंबरपर्यंत नोंदणी करा

नगर – जागतिक कौशल्य स्पर्धा २०२६ चे आयोजन शांघाई येथे होणार आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी इच्छुक व पात्र उमेदवारांनी https://www.skillindiadigital.gov.in या वेबपोर्टलवर ३० सप्टेंबर पर्यंत नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले.

जागतिक कौशल्य स्पर्धा ही जगातील सर्वात मोठी व्यवसायिक शिक्षण व कौशल्य उत्कृष्टता स्पर्धा असून दर दोन वर्षांनी आयोजित केली जाते. जगभरातील २३ वर्षाखालील तरुणांना आपली कौशल्ये सादर करण्याची ही संधी ऑलिंपिक खेळांच्या तोडीची मानली जाते. यापूर्वी झालेल्या ४७ व्या जागतिक कौशल्य स्पर्धेत ६३ क्षेत्रांमधून ५० देशांतील १० हजारांहून अधिक उमेदवार सहभागी झाले होते. ही स्पर्धा १५ देशांत १२ आठवडे चालली होती.

२०२६ च्या जागतिक स्पर्धेसाठीच्या पूर्वतयारीच्या दृष्टीने ६३ क्षेत्रांशी संबंधित जिल्हा व राज्यस्तरावर व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय व विविध औद्योगिक आस्थापनांच्या सहकार्याने कौशल्य स्पर्धा आयोजित करण्यात येत आहेत. जिल्हा, विभाग, राज्य व देश पातळीवरील स्पर्धांमधून निवड झालेल्या उमेदवारांची नावे पुढील जागतिक नामांकनासाठी पाठविली जातील.

या स्पर्धेसाठी वयोमर्यादा हा एकमेव निकष आहे. पन्नास क्षेत्रांकरिता उमेदवाराचा जन्म १ जानेवारी २००४ किंवा त्यानंतरचा असावा. तर डिजिटल कन्स्ट्रक्शन, क्लाऊड कंप्युटिंग, सायबर सुरक्षा, आयसीटी नेटवर्क सुरक्षा, डिटिव्ह मॅन्युफॅक्चरिंग, इंडस्ट्रियल डिझाईन टेक्नॉलॉजी, इंडस्ट्री ४.०, मेकाट्रॉनिक्स, रोबोट सिस्टीम इंटीग्रेशन, वॉटर टेक्नॉलॉजी व एअरक्राफ्ट या क्षेत्रांकरिता उमेदवाराचा जन्म १ जानेवारी २००१ किंवा त्यानंतरचा असणे आवश्यक आहे.

शांघाई येथे होणाऱ्या जागतिक कौशल्य स्पर्धा २०२६ साठी जिल्हा, विभाग, राज्य व देश पातळीवरील प्रतिभासंपन्न उमेदवारांचे नामांकन करण्यासाठी सर्व प्रशिक्षण संस्था व महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी अंतर्गत व्यवसाय प्रशिक्षण संस्थांनी स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले.

# प्राथमिक शिक्षकांचा ४ ऑक्टोबरला जिल्हाधिकारी कार्यालयावर मूकमोर्चा

## टीईटी परीक्षेला प्रचंड विरोध, राज्यभरात प्रत्येक जिल्ह्यात होणार आंदोलन

नगर – सर्वोच्च न्यायालयाने १ सप्टेंबरला शिक्षकांसाठी शिक्षक पात्रता परीक्षा सक्तीची केल्याचा निर्णय दिला आहे. या निर्णयामुळे राज्यात हजारो शिक्षकांच्या नोकर्या धोक्यात येणार आहे. या निर्णयामुळे २० वर्षे अथवा त्याहून अधिक सेवा देणार्याय शिक्षकांना परीक्षेला समोरे जावे लागणार आहे. न्यायालयाच्या सर्वोच्च निर्णयास शिक्षकांचा विरोध असून यासाठी ४ ऑक्टोबरला मुंबईत महामूक मोर्चा काढण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावर चर्चा करण्यासाठी व पुढील धोरण ठरवण्यासाठी राज्य प्राथमिक शिक्षक मध्यवर्ती संघटनेचे राज्य अध्यक्ष केशवराव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथे शेतकरी कामगार पक्षाच्या पक्ष कार्यालयात बैठक पार पडली. बैठकीसाठी शिक्षक मध्यवर्ती संघटनेचे देविदास बसवदे, साजिद निसार अहमद, युवराज पोवाडे, चिंतामण वेखंडे, यादव पवार, कार्याध्यक्ष भारत शेलार, प्रसाद म्हात्रे, वसंत मोकळ, सुरेश खरात, चंद्रकांत दामेकर व अनेक शिक्षक संघटनांचे राज्याध्यक्ष व पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीत टीईटी परीक्षा दोन वर्षात उत्तीर्ण होण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय सर्वांना बंधनकारक असल्याने परीक्षा पास केली नाही, तर सक्तीने सेवानिवृत्त व्हावे लागेल. या निर्णयाचा फेरविचार व्हावा म्हणून उत्तर प्रदेश सरकारच्या धरतीवर महाराष्ट्र शासनाने ३ ऑक्टोबरपर्यंत पुनर्विचार याचिका दाखल करावी व शिक्षकांना दिलासा द्यावा, अन्यथा ४ ऑक्टोबरला राज्यातील प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयावर मध्यवर्ती संघटनेच्या वतीने महामूक मोर्चा निर्णय घेण्यात आला आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या निकालामुळे देशातील शिक्षक अस्वस्थ झाले आहेत. यापूर्वीच्या शिक्षकांच्या भरतीमध्ये शिक्षकांनी निवड मंडळाच्या परीक्षा दिलेल्या आहेत. आता सर्वोच्च न्यायालयाने टीईटी परीक्षा बंधनकारक केल्याने प्रमोशनच्याही संधी शिक्षकांना मिळणार नाही. उलट नोकरीच धोक्यात आली आहे. फक्त शिक्षक केडरलाच टीईटी परीक्षा बंधनकारक. मात्र इतर शासनाचे जे कर्मचारी आहेत, त्यांना मात्र कोणतीच परीक्षा नाही. जे राजपत्रित अधिकारी आहेत, त्यांनाही पुन्हा परीक्षेसाठी सक्ती नाही. ज्यांची सेवा २० ते ३० वर्षे झाली आहे, त्यांना टीईटी परीक्षेची गरजच काय ? एवढा मोठा अनुभव व दरवर्षी अनेक प्रशिक्षणे होतात. अभ्यासक्रम बदलल्यानंतर शिक्षकांना प्रशिक्षण दिले जाते.

सध्या माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षकही अपडेट झाले आहेत. वेळोवेळी अनेक ऑनलाईन प्रशिक्षणे शिक्षक घेतात. अशावेळी या परीक्षेबद्दल सक्ती करणे कितपत योग्य आहे? जर शासनाने याबाबत पुनर्विचार याचिका दाखल केली नाही, तर शिक्षकांच्या अस्तित्वासाठी शिक्षकांना मोठे आंदोलन उभे करावे लागले, असा इशारा शिक्षक नेते बापूसाहेब तांबे, दत्ता पाटील कुलट, गोकुळ कळमकर, राजेंद्र सदगीर, संतोष दुसुंगे, अर्जुनराव शिरसाठ, बाबासाहेब खरात, विद्याताई आढाव, रविकिरण साळवे, बबन गाडेकर, प्रकाश नांगरे दिला आहे.

# सावेडीत पुन्हा चेन स्नॅचिंग, महिलेचे मंगळसूत्र पळवले

## एका आरोपीला पोलिसांनी ठोकल्या बेड्या, दुसऱ्याचा शोध सुरु

नगर – सावेडी उपनगरात एकविरा चौक ते पारिजात चौक रस्त्यावर पुन्हा चेन स्नॅचिंगची घटना घडली आहे, रस्त्याने पायी चाललेल्या महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र पाठीमागून मोटारसायकल वर आलेल्या दोघांना २५ सप्टेंबर रोजी सकाळी ७.३० च्या सुमारास पळवले. दरम्यान यातील एका आरोपीला तोफखाना पोलिसांनी रात्री उशिरा बोल्हेगाव परिसरात पकडले आहे, तर दुसरा आरोपी फरार झाला आहे.

याबाबत लीलाबाई गोरख सायकड (वय ६६, रा. आसरा सोसायटी, गुलमोहर रोड) यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी या २५ सप्टेंबर रोजी सकाळी ७.३० च्या सुमारास एकविरा चौक ते पारिजात चौक रस्त्याने पायी जात असताना कोहिनूर मंगल कार्यालयाजवळील सिद्धेश्वर कॉलनी जवळ त्यांच्या पाठीमागून मोटारसायकलवर २ अनोळखी इसम आले. त्यातील पाठीमागे बसलेल्या इसमाने काही कळायच्या आत फिर्यादी यांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र हिसका मारून तोडले व ते घेवून दोघे जण भरधाव वेगात तेथून पसार झाले. फिर्यादी यांनी आरडाओरडा केल्यावर लोक जमा झाले मात्र तो पर्यंत चोरट्यांनी पोबारा केला होता.

या घटनेची माहिती तोफखाना पोलिसांना देण्यात आली. त्यानंतर शहर विभागाचे पोलिस उपअधिक्षक दिलीप टिपरसे, पोलिस निरीक्षक आनंद कोकरे, उपनिरीक्षक योगेश चाहेर यांच्यासह पथकाने घटनास्थळी भेट देत पाहणी केली. लीलाबाई सायकड यांच्या फिर्यादी वरून अज्ञात २ आरोपींच्या विरुद्ध जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचा तपास पोलिस उपनिरीक्षक योगेश चाहेर यांच्या कडे देण्यात आला.

तपासी अधिकारी चाहेर यांनी घटनास्थळ व आजूबाजूच्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज चे तांत्रिक विश्लेषण तसेच गोपनीय माहिती काढत सदर गुन्हा महेश बाबासाहेब आरा (वय १८, रा. गजानन कॉलनी, एमआयडीसी) याने केला असल्याचे निष्पन्न केले. तसेच त्याला रात्री उशिरा बोल्हेगाव परिसरात पकडून अटक केली आहे. त्याचा दुसरा साथीदार मात्र पसार झालेला असून पोलिस त्याचा शोध घेत आहेत.

# खडी, वाळूच्या ढंपरवर कारवाई न करण्यासाठी १५ हजाराची लाच घेताना पोलिस कर्मचाऱ्याला 'एसीबी' ने रंगेहाथ पकडले

नगर – वाळू, खडी आणि मुरुमाच्या वाहतुकीसाठी दरमहा २० हजार रुपयांची लाच (हप्ता) मागणाऱ्या राहाता पोलीस ठाण्यातील पोलीस कॉन्स्टेबल अनिल रामनाथ गवांदे (वय ३५) याला नगरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने १५ हजार रुपये स्वीकारताना रंगेहाथ पकडले. २५ सप्टेंबर रोजी ही कारवाई करण्यात आली आहे.

याबाबतची माहिती अशी की, तक्रारदार यांचा खडी, मुरुम आणि वाळू वाहतुकीचा व्यवसाय आहे. त्यांच्या खडी भरलेल्या ढंपरवर १८ सप्टेंबर रोजी राहाता पोलिसांनी कारवाई करत तो जप्त केला होता. त्यानंतर २१ सप्टेंबर रोजी पोलीस कॉन्स्टेबल गवांदे यांनी तक्रारदारांना फोन करून भेटायला बोलावले.

राहाता पोलीस ठाण्याच्या हद्दीत व्यवसाय सुरळीत चालू ठेवायचा असेल आणि ढंपर वरील कारवाई टाळायची असेल, तर दरमहा २० हजार रुपये हप्ता द्यावा लागेल, अशी मागणी कॉन्स्टेबल गवांदे यांनी तक्रारदाराकडे केली. त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने तक्रारदाराने २४ सप्टेंबर रोजी अहिल्यानगर येथील लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या कार्यालयात तक्रार दाखल केली. या तक्रारीची पडताळणी केली असता, पोलीस कॉन्स्टेबल गवांदे यांनी २० हजार रुपयांची मागणी करून तडजोडीअंती १५ हजार रुपये स्वीकारण्याची तयारी दर्शवल्याचे स्पष्ट झाले.

त्यानुसार, २५ सप्टेंबर रोजी लाच लुचपतच्या पथकाने राहाता पोलीस स्टेशन परिसरात सापळा रचला. यावेळी पोलीस कॉन्स्टेबल अनिल गवांदे याने तक्रारदाराकडून १५ हजार रुपयांची लाच स्वीकारताच लाच लुचपतच्या पथकाने त्याला तातडीने रंगेहाथ पकडले.

पोलीस कॉन्स्टेबल गवांदे याच्या विरोधात राहाता पोलिस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ च्या कलम ७ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई 'लाच लुचपत' चे पोलीस उपअधीक्षक अजित त्रिपुटे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि. राजू आल्हाट, पोलिस अंमलदार चंद्रकांत काळे, शेखर वाघ, किशोर कुळधर, दशरथ लाड यांच्या पथकाने केली आहे.


महिलेला पिस्तुलचा धाक दाखवून दागिने लुटणाऱ्या दोघांना पकडल्यानंतर त्यांच्यासमवेत एलसीबीचे पथक.

# पिस्तुलाच्या धाकाने महिलेला लुटणारे दोन आरोपी जेरबंद; २ लाख ५ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत

नगर – कापुरवाडी (ता. नगर) परिसरात वृध्द महिलेचे तोंड दाबुन दागिने लुटणाऱ्या नेवासा तालुक्यातील दोघा सराईत गुन्हेगारांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी गजाआड केले आहे. विठ्ठल ज्ञानेश्वर तुपे (वय २४,रा. जेऊर हैबती, कुकाणा, ता. नेवासा) व सुदाम विक्रम जाधव (वय २९,रा. सुलतानपुर, ता. नेवासा) अशी त्यांची नावे आहेत. त्यांनी फिरोज अजिज शेख (रा. नेवासा फाटा, ता. नेवासा) याच्यासह गुन्हा केल्याची कबूली दिली आहे. फिरोज शेख पसार असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

८ सप्टेंबर रोजी सकाळी ११.३० च्या सुमारास सरस्वती शिवाजी दुसुंगे (रा. दुसुंगेमळा, पिंपळगाव उज्ञैनी रस्ता, कापुरवाडी) या मळगंगा देवीच्या मंदिरात दर्शनासाठी गेल्या होत्या. या दरम्यान तीन अनोळखी इसमांनी त्यांचे तोंड दाबून आणि डोक्यावर पिस्तुल लावून त्यांचे गळ्यातील व कानातील सोन्याचे दागिने असा एकूण २ लाख ३५ हजार रूपये किमतीचा ऐवज चोरून नेला होता. सदर घटनेबाबत भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक दीपक मेढे व राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार विष्णु भागवत, भगवान थोरात, सुनील मालणकर, भगवान धुळे, अर्जुन बडे यांचे पथक या गुन्ह्याचा समांतर तपास करत होते. त्यांनी घटनास्थळी भेट देऊन संशयित आरोपींची माहिती संकलित केली.

तपासादरम्यान माहिती मिळाल्याप्रमाणे संशयित आरोपी विठ्ठल तुपे, सुदाम जाधव व त्यांचा साथीदार फिरोज शेख या गुन्ह्यात सामील असल्याचे उघड झाले. पोलिसांनी कुकाणा येथून विठ्ठल तुपे आणि सुदाम जाधव यांना ताब्यात घेतले. पोलिसांनी त्यांच्याकडून सोन्याचे दागिने आणि दुचाकी असा एकूण २ लाख ५ हजार रूपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला.

विठ्ठल ज्ञानेश्वर तुपे याच्याविरूध्द पूर्वी नेवासा पोलीस ठाणे व तोफखाना पोलीस ठाणे येथे दरोडा व जबरी चोरीचे २ गुन्हे दाखल आहेत. तसेच सुदाम विक्रम जाधव याच्याविरूध्द पाथर्डी पोलीस ठाणे येथे चोरीचा १ गुन्हा दाखल असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# कॉपर चोरी करणारी आंतरजिल्हा टोळी पोलिसांनी पकडली; आठ गुन्हे उघडकीस, ३ लाख ५९ हजारांचा मुद्देमाल हस्तगत


जिल्ह्यात विविध भागात कॉपर वायर चोरणारी आंतरजिल्हा टोळी पकडल्यानंतर त्यांच्यासमवेत एलसीबीचे पथक.

नगर – जिल्ह्यात विविध भागात कॉपर वायर चोरणारी आंतरजिल्हा टोळी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडली असून या टोळीकडून ८ गुन्हे उघडकीस आले आहेत. त्यांच्या ताब्यातून ३ लाख ५९ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

याबाबतची माहिती अशी की, १५ सप्टेंबर रोजी फिर्यादी नागेश पांडुरंग पवार (रा. राशिन ता. कर्जत) यांचे राशिन ते काळेवाडी जाणारे रोडलगत असलेले शिवम मशिनरी ऍण्ड स्टुल्स दुकानाचे शटर कोणीतरी अज्ञात चोरट्याने उचकटुन दुकानातील ६४ हजार रुपये किमतीचे कॉपर वायर चोरुन नेली होती. नगर जिल्ह्यामध्ये व्यापाऱ्यांचे दुकाने फोडुन दुकानातील कॉपर वायर चोरीच्या घटना वारंवार होत असल्याने पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी स्थानिक गुन्हे शाखेस कॉपर चोरी करणारे आरोपींची माहिती काढुन गुन्हे उघडकीस आणणेबाबत सुचना दिल्या होत्या. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. किरणकुमार कबाडी यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार रमेश गांगर्डे, गणेश लबडे, फुरकान शेख, शामसुंदर जाधव, मनोज साखरे, भाऊसाहेब काळे, अमोल कोतकर, प्रशांत राठोड, आकाश काळे, बाळासाहेब खेडकर, महादेव भांड, अरुण मोरे, महिला पोलीस अंमलदार सोनाली भागवत यांचे पथक तयार करुन सदर पथकास कॉपर चोरी करणारे आरोपींची माहिती काढुन गुन्हे उघडकीस आणण्याच्या सूचना देण्यात आल्या. पथकाने जिल्ह्यातील कॉपर चोरीचे ठिकाणी भेट देवुन माहिती संकलित केली.

तसेच अशाप्रकारे गुन्हे करणारे रेकॉर्डवरील आरोपींची माहिती घेण्यात आली. पथकाने सलग ८ दिवस तपास करुन आरोपींनी गुन्ह्यामध्ये वापरलेली चार चाकी गाडी निष्पन्न केली. सदर चार चाकी गाडी वापरणारे इसमांची माहिती काढली असता सदरची गाडी ही रेकॉर्डवरील आरोपी महादेव पवार (रा. अकलुज, सोलापुर) हा वापरत असल्याची माहिती प्राप्त झाली. त्याचा शोध घेत महादेव रंगनाथ पवार सह त्याचा साथीदार दादा लाला काळे (वय १९, रा. सवतगाव ता. माळशिरस जि. सोलापुर) यांना ताब्यात घेतले. त्यांच्या कडे कसून चौकशी केल्यावर त्यांनी त्यांचे साथीदार रामा लंग्या काळे (रा. तुळजापुर नाका जुना डेपो, पारधी पेढी ता. जि. धाराशीव), महादेव बाबु काळे (रा. तुळजापुर नाका जुना डेपो, पारधी पेढी ता. जि. धाराशीव), दिलीप मोहन पवार (रा. चारी माळी नगर ता. माळशिरस जि. सोलापुर), सुरेश नामु काळे (रा. सवतगाव ता. माळशिरस जि. सोलापुर), सुरेश नामदेव चव्हाण (रा. सवतगाव, ता. माळशिरस जि. सोलापुर) यांचेसह गुन्हा केल्याचे कबुली दिली आहे. ताब्यातील आरोपींनी सांगितलेल्या माहितीप्रमाणे ३ लाख ५९ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

# जिल्हा बँकस असोसिएशनचा २७ सप्टेंबर रोजी पुरस्कार सोहळा

नगर – अहमदनगर जिल्ह्यातील सहकारी बँकांनी केलेल्या कार्याची दखल व त्यांनी केलेल्या कार्याला प्रोत्साहन म्हणून अहमदनगर जिल्हा बँक असोसिएशन दरवर्षी उत्कृष्ट कार्य केलेल्या नागरी सहकारी बँकांचा गौरव, पुरस्कार देऊन करत असते.

यावर्षी पुरस्कार सोहळा २७ सप्टेंबर रोजी हॉटेल एनराइज, अहिल्यानगर येथे आयोजित केलेले आहे. पुरस्कार वितरण सोहळा जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे व जी एस महानगर बँकेच्या अध्यक्षा श्रीमती गीतांजलीताई उदय शेळके यांच्या हस्ते होणार आहे.

व्यवसाय वाढ व योग्य एनपीएचे व्यवस्थापन करणाऱ्या बँकांना 'बिंग्स अवॉर्डने' सन्मानित करण्यात येणार आहे. व विविध बँकिंग प्रशिक्षणात सहभागी होणाऱ्या बँकांना 'बिट्स अवॉर्ड'ने सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच जिल्ह्यात उत्तम कामगिरी करणाऱ्या बँकेला उत्कृष्ट नागरी सहकारी बँक, तंत्रज्ञानचा उत्तम वापर करणाऱ्या बँकेला बँकटेक पुरस्कार देण्यात येणार आहे. तसेच या वर्षी ज्या संचालकाने सहकारी बँक क्षेत्रात भरीव योगदान दिले आहे त्यांना जीवन गौरव पुरस्कार – बँकने सन्मानित करण्यात येणार आहे. या पुरस्कार सोहळ्यास अहमदनगर जिल्हा व परिसरातील ३६ बँकांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहे. नागरी सहकारी बँकांमध्ये या सोहळ्या बाबत विशेष उत्सुकता असते अशी माहिती असोसिएश चे चेअरमन सत्येन मुंदडा यांनी दिली.

# सोनल सैंदर यांचे अल्प आजाराने निधन



नगर – तेलीखुंट भागातील शिंपी गल्लीतील रहिवासी सोनल कैलास सैंदर (वय ३५) यांचे २६ सप्टेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई, पत्नी, आजोबा, २ मुले, भाऊ असा परिवार आहे.

# राजेंद्र पडोळे यांचे अल्प आजाराने निधन



नगर – चिचोंडी पाटील येथील रहिवासी राजेंद्र उमाजी पडोळे (वय ४५) यांचे २६ सप्टेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर चिचोंडी पाटील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, १ भाऊ, भावजय, पुतणे असा परिवार आहे.

# अनुसूचित जमातींच्या यादीत शासनाने तात्काळ दुरुस्ती करुन 'धनगर' नावाचा जीआर काढावा अन्यथा देशभर तीव्र आंदोलन

नगर – धनगर समाजाने राज्य सरकारकडे अनुसूचित जमातींच्या यादीतील नोंद क्र. ३६ मध्ये असलेले Dhangad (धनगड) हे नाव बदलून Dhangar (धनगर) असे वाचावे, यासाठी तात्काळ शासन आदेश जारी करण्याची मागणी केली आहे. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जिल्हाधिकारीमार्फत निवेदन देण्यात आले असून, शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा अन्यथा महाराष्ट्रासह देशभरात तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही देण्यात आला आहे.


अनुसूचित जमातींच्या यादीतील नोंद क्र. ३६ मध्ये असलेले Dhangad (धनगड) हे नाव बदलून Dhangar (धनगर) असे वाचावे, यासाठी तात्काळ शासन आदेश जारी करण्याच्या मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी डा. पंकज आशिया यांना देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्रात Dhangad (धनगड) नावाची कोणतीही जात अथवा जमात अस्तित्वात नाही. जे आहेत ते फक्त Dhangar (धनगर) आहेत. यासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयात दाखल याचिका क्र. ४९१९/२०१७ मध्ये राज्य सरकारनेच प्रतिज्ञापत्राद्वारे मान्य केले आहे की, धनगड नावाचा एकही व्यक्ती आजवर आढळलेला नाही. तरीसुद्धा अनुसूचित जमातींच्या यादीत चुकीची नोंद राहिल्याने धनगर समाजाला त्यांच्या हक्कांपासून वंचित राहावे लागत आहे.

याच निवेदनात सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाचा उल्लेख करून स्पष्ट करण्यात आले आहे की, आरक्षणाच्या यादीत अस्तित्वात नसलेली जात/जमात समाविष्ट करणे संविधानाच्या कलम ३४२ (१) विरोधात आहे. त्यामुळे या दुरुस्तीचा प्रश्न संसदेसमोर नेण्याची गरज नाही. राज्यपालांच्या परवानगीने राज्य सरकारला शासन आदेश जारी करण्याचा अधिकार आहे. महसूल व वन विभागाने १० ऑक्टोबर २०२४ रोजी अशा प्रकारचा शासन निर्णय घेतल्याचे उदाहरणही धनगर समाजाने पुढे केले आहे.

धनगर समाजाने स्पष्ट केले आहे की, शासनाने शासन आदेश न काढता आंदोलन दडपण्यासाठी जबरदस्तीचा मार्ग अवलंबल्यास, महाराष्ट्रापुरतेच नव्हे तर महाराष्ट्राबाहेरही व्यापक आंदोलन छेडले जाईल. त्यामुळे संघर्ष टाळायचा असेल तर राज्य सरकारने संविधानिक व न्यायालयीन तरतुदींनुसार तातडीने धनगर समाजाच्या मागणीवर निर्णय घ्यावा.

यावेळी निशांत दातीर, अशोक होनमाने, बाबासाहेब तागड, निवृत्ती दातीर, राजेंद्र तागड, सूर्यकांत तागड, नवनाथ ठोंबरे, आश्रू नरोटे, रोहन धवन, गणेश ढवण, कांतीलाल जाडकर आदींसह धनगर समाजाचे कार्यकर्ते उपस्थित होते.



एशियन आय हॉस्पिटल, पुणेचे संचालक नेत्रतज्ज्ञ डॉ. वर्धमान कांकरीया यांना आंध्र प्रदेश नेत्रतज्ज्ञ संघटनेतर्फे (APOS) राष्ट्रीय पातळीवरील 'डॉ. गोपालकृष्ण ओरॅशन पुरस्कार' प्रदान करण्यात आला. हा सन्मान गुंटूर येथे २० सप्टेंबर रोजी झालेल्या वार्षिक परिषदेत त्यांच्या मोतीबिंदू आणि लेसिक शस्त्रक्रियेमधील आंतरराष्ट्रीयस्तरावर मान्यता मिळालेल्या संशोधन कार्याबद्दल देण्यात आला.

# डॉ. वर्धमान कांकरीया यांना राष्ट्रीय स्तरावरील 'डॉ. गोपालकृष्ण ओरॅशन पुरस्कार' प्रदान

नगर – एशियन आय हॉस्पिटल, पुणेचे संचालक नेत्रतज्ज्ञ डॉ. वर्धमान कांकरीया यांना आंध्र प्रदेश नेत्रतज्ज्ञ संघटनेतर्फे (APOS) राष्ट्रीय पातळीवरील 'डॉ. गोपालकृष्ण ओरॅशन पुरस्कार' प्रदान करण्यात आला. हा सन्मान गुंटूर येथे २० सप्टेंबर रोजी झालेल्या वार्षिक परिषदेत त्यांच्या मोतीबिंदू आणि लेसिक शस्त्रक्रियेमधील आंतरराष्ट्रीयस्तरावर मान्यता मिळालेल्या संशोधन कार्याबद्दल देण्यात आला.

हा पुरस्कार ऑल इंडिया ऑप्थॅल्मॉलॉजिकल सोसायटीचे अध्यक्ष डॉ. पार्थ बिस्वास यांच्या हस्ते तसेच APOS च्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला. यावेळी डॉ. कांकरीया यांनी गत तीन दशकांतील LASIK शस्त्रक्रियांमधील प्रगती या विषयावर संशोधनात्मक माहितीचा आढावा सादर केला. देशभरातून १५०० हून अधिक नेत्रतज्ज्ञ या परिषदेला उपस्थित होते. विशेष म्हणजे, हा मान मिळवणारे डॉक्टर वर्धमान कांकरिया हे महाराष्ट्रातील पहिलेच नेत्रतज्ज्ञ ठरले.

डॉ. वर्धमान कांकरीया यांनी आजवर ४० हजारांहून अधिक चष्मा घालविण्याच्या शस्त्रक्रिया केल्या असून, भारतात सर्वाधिक लेसिक शस्त्रक्रिया केल्याबद्दल त्यांचे नाव लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड्‌र्समध्ये नोंदले गेले आहे. आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये त्यांनी ५० पेक्षा अधिक संशोधन निबंध प्रकाशित करून भारताचे नाव नेत्रशास्त्र क्षेत्रात उंचावले आहे.

कृतज्ञता व्यक्त करताना डॉ. कांकरीया म्हणाले, APOS ने दिलेला हा सन्मान प्रेरणादायी असून, रुग्णांच्या हितासाठी आणखी वैज्ञानिक कार्य करण्याची उर्जा देणार आहे. ही शाब्बासकीची थाप अधिक सेवा कार्य करण्यासाठी प्रोत्साहित करते.

# कर्मवीरांचा त्यागमय आदर्शच शिक्षणातील प्रश्न सोडवू शकतो

## डॉ. कुंडलिकराव शिंदे यांचे प्रतिपादन; शहरातील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील विद्यालयात कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती साजरी



लक्ष्मीबाई भाऊराव पाटील विद्यालयात कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती साजरी करण्यात आली.

नगर – कर्मवीर भाऊरावांनी उभ्या केलेल्या शिक्षण व्यवस्थेने आज बहुजन समाज सावरला आहे. पूर्वी कोणत्याही सोयी–सुविधा नसताना कर्मवीर अण्णांनी शैक्षणिक चळवळ उभी केली. मात्र सध्या सोयी–सुविधा असताना देखील शिक्षण क्षेत्रात अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत. कर्मवीरांच्या त्यागमय वृत्तीने शिक्षण क्षेत्रात कार्य केल्यास ते प्रश्न सुटणार असल्याचे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेचे माजी सहसचिव डॉ. कुंडलिकराव शिंदे यांनी केले.

कापड बाजार येथील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात २५ सप्टेंबर रोजी पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३८ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून डॉ. शिंदे बोलत होते. रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अर्जुनराव पोकळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अभिषेक कळमकर, ज्ञानदेव पांडुळे, स्कूल कमिटी सदस्य अंबादास गारुडकर, विश्वासराव काळे, माजी प्राचार्य कैलासराव मोहिते, माध्यमिकच्या मुख्याध्यापिका छायाताई काकडे, प्राथमिकचे मुख्याध्यापक लक्ष्मीताई आहेर, श्यामराव व्यवहारे, शरद गावडे, ज्योतीताई मोकळ, लक्ष्मण ठाणगे आदींसह शालेय शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

पुढे बोलताना डॉ. शिंदे म्हणाले की, कर्मवीर अण्णांनी सत्यशोधक समाजाच्या विचारांनी प्रेरित होऊन शेतकरी, कामगार, गरीब, अस्पृश्य, दुर्लक्षित यांच्यासाठी आयुष्य वाहून घेतले. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे खरे शस्त्र आहे. या जाणिवेतून त्यांनी रयत शिक्षण संस्था स्थापन केली. या संस्थेमुळे ग्रामीण भागात गरीब विद्यार्थ्यांना शिक्षण घेता आले. शिक्षणाशिवाय समाजाचा विकास होऊ शकत नाही, ही जाणीव ठेऊन त्यांनी केलेले कार्य परिवर्तनाची नांदी ठरली असल्याचे ते म्हणाले.

प्रारंभी शाळेतील वडाच्या झाडाखाली असलेल्या डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. लेझीम व वाद्यवृंद पथकाने प्रात्यक्षिके दाखवली. यावेळी रांगोळी स्पर्धेनिमित्त विद्यार्थिनींनी विविध सामाजिक विषयांवर रेखाटलेल्या रांगोळी दालनाचे व अटल टिंकरिंग लॅब प्रदर्शनाचे उद्‌घाटन करण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांनी बनविलेले विविध इलेक्ट्रॉनिक व ए आय मॉडेल प्रदर्शनात ठेवले होते.

प्रास्ताविकात छायाताई काकडे यांनी संपूर्ण राज्यात रयत शिक्षण संस्थेच्या शाळांमध्ये कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती उत्साहात साजरी होत असल्याचे सांगितले. कर्मवीर अण्णांनी शिक्षणाने जीवनात यशस्वी होण्याचा मार्ग दाखविला. शिक्षण घेण्यासाठी आर्थिक परिस्थिती चांगली असल्याची गरज नाही तर जिद्द ठेवण्याचे त्यांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले.

अभिषेक कळमकर म्हणाले, आशिया खंडातील सर्वात मोठी शिक्षण संस्थेचा मान रयत शिक्षण संस्थेला आहे. या संस्थेला १०० वर्षांपेक्षा जास्त कालावधी झाला आहे. ही संस्था फक्त महाराष्ट्रात नाही, तर संपूर्ण भारतात शिक्षणासाठी प्रेरणादायी ठरली आहे. कर्मवीर अण्णांनी या शाखा समाजातील शेवटच्या घटकांना शिक्षण मिळण्यासाठी सुरु केल्या. अण्णांचा हा विचार आजही तितकाच या संस्थेच्या माध्यमातून जिवंत आहे. कारण समाजात शिक्षण हेच खरे शस्त्र आहे. शिक्षणाशिवाय समाजाचा विकास होऊ शकत नसल्याचे ते म्हणाले. अर्जुनराव पोकळे म्हणाले, कर्मवीरांनी खऱ्या अर्थाने बहुजन समाजाची मुले घडवली. शिक्षणाची संधी उपलब्ध करून ज्ञानाची गंगा घरोघरी पोहोचवली असल्याचे सांगून, जीवनात उंच ध्येय ठेवून वाटचाल करण्याचे विद्यार्थ्यांना त्यांनी सांगितले. यावेळी विद्यार्थ्यांनी भाषणातून डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. सूत्रसंचालन प्रदिप पालवे व स्मिता पिसाळ यांनी केले. महादेव भद्रे यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राथमिक व माध्यमिक विभागातील सर्व सेवकांचे सहकार्य लाभले.

# गुरुंच्या प्रेरणेने शिंगवी परिवाराची चार दशकांची लोकसेवा

## आ. रोहित पवारांचे गौरवोद्‌गार; मोफत मोतीबिंदू तपासणी व शस्त्रक्रिया शिबिर उत्साहात

जामखेड – गुरुंची प्रेरणा घेऊन गेली चार दशके लोकसेवा अखंड सुरू ठेवणे हे मोठे कार्य आहे. शिबिरांचे आयोजन सोपे नसते; अनेक अडचणींवर मात करत ही सेवा शिंगवी परिवार करीत आहे. लोकांवरील प्रेम आणि गुरुंच्या प्रती आस्था यामुळेच त्यांच्या हातून अशी चांगली सेवा घडते. अशोक शिंगवी आणि अभय शिंगवी यांनी केलेल्या सामाजिक कार्याचे मी अभिनंदन करतो, असे गौरवोद्‌गार आमदार रोहित पवार यांनी काढले.

स्व.सुंदरबाई कन्हैयालाल शिंगवी सेवाभावी प्रतिष्ठान यांच्या प्रेरणेने व आदर्शऋषीजी म.सा. यांच्या आशीर्वादाने शिंगवी चष्माघर व आनंदऋषीजी नेत्रालय अहिल्यानगर संयुक्त विद्यमाने मोफत मोतीबिंदू



शिंगवी चष्माघर व आनंदऋषीजी नेत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजिलेल्या मोफत मोतीबिंदू तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे दीपप्रज्वलनाने उद्‌घाटन करताना खा. रोहित पवार आदी.

तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर आयोजित करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

या शिबिराचे उद्‌घाटन १९ सप्टेंबर रोजी आमदार रोहित पवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष अशोक शिंगवी, अभय शिंगवी, राष्ट्रवादी पार्टीचे वैजिनाथ पोले, जिल्हा उपाध्यक्ष सुरेश भोसले, अशोक कानडे, विकास राळेभात, शहराध्यक्ष राजेंद्र गोरे, तालुकाध्यक्ष विजयसिंह गोलेकर,शिवाजीराव ढाळे, नगराध्यक्ष निखिल घायतडक, नगरसेवक बिभिषण धनवडे, संदीप गायकवाड, प्रविण उगले, अनिल रेडे आदी उपस्थित होते.

शिबीरामध्ये १०८ रूग्णांची तपासणी करून ६३ रुग्णांवर शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत.

# 'रामकृष्ण'च्या विद्यार्थ्यांची स्टेट लेव्हलसाठी निवड



कार्तिक निक्रड



आर्यन पर्वते

नगर – श्री रामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशनचे सेठ नंदलाल धूत इंग्लिश मीडियम स्कूल व मोहनलाल रामावतार मानधना ज्युनिअर कॉलेजच्या इ. बारावी विज्ञान शाखेमधील कार्तिक महादेव निक्रड व आर्यन सचिन पर्वते या दोन विद्यार्थ्यांनी उशो या गेम मध्ये अहिल्यानगर जिल्ह्याअंतर्गत झालेल्या अंतरशालेय स्पर्धेमध्ये क्रमाने ८५ किलो खालील व ६० किलोखालील गटामध्ये प्रथम क्रमांक मिळवून झोनल लेव्हलला त्यांची निवड झाली. नुकत्याच पुणे येथे झालेल्या झोनल लेवल स्पर्धेमध्ये या दोन विद्यार्थ्यांनी त्यांच्या वयोगटांमध्ये प्रथम व दुसरा क्रमांक मिळवून विजय संपादन केला असून कार्तिक महादेव निक्रड या विद्यार्थ्यांची निवड स्टेट लेव्हल साठी झालेली आहे.

शाळेचे क्रीडाशिक्षक दीपक धनवटे व अजित लोळगे यांचे मार्गदर्शन मिळाले

संस्थेचे अध्यक्ष श्रीगोपाल धूत, उपाध्यक्ष व शाळा समितीचे चेअरमन नंदकुमार झंवर, उपाध्यक्ष मोहनलाल मानधना व राजेश झंवर, सचिव डॉ. शरद कोलते, सहसचिव बजरंग दरक, संस्थेच्या मुख्याध्यापिका, उपमुख्याध्यापिका या दोघांचे कौतुक केले.



वक्तृत्व स्पर्धेत यश संपादन करणाऱ्या रामकृष्णच्या विद्यार्थिनींचा सत्कार करताना संस्थेचे अध्यक्ष श्रीगोपाल धूत आदी.

# राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत 'रामकृष्ण'च्या विद्यार्थिनींचे यश

नगर – श्री शारदा इंग्लिश मीडियम स्कूल कोपरगावतर्फे घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय हिंदी वक्तृत्व स्पर्धेत श्री रामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशनचे सेठ नंदलाल धूत इंग्लिश मीडियम स्कूल व मोहनलाल रामावतार मानधना ज्युनिअर कॉलेज मधील सहभागी विद्यार्थिनींना तृतीय क्रमांकाने सन्मानित करण्यात आले. विद्यालयातील इ. दहावी मधील ओशमी तवर व इयत्ता नववी मधील चैताली चौगुले या विद्यार्थिनींनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेमध्ये संपूर्ण राज्यातून ४० शाळांमधील ८० स्पर्धक सहभागी झाले होते. हे स्पर्धक मुंबई, पुणे, नाशिक, अहिल्यानगर अशा विविध ठिकाणाहून सहभागी झाले होते. या सर्व स्पर्धकांमधून ओशमी व चैताली त्या गुणी विद्यार्थिनींनी बाजी मारत तृतीय क्रमांक संपादन केला. आयोजकांकडून विद्यार्थिनींना रोख दोन हजार रुपयांचे पारितोषिक, ट्रॉफी व प्रशस्तीपत्रकाने गौरविण्यात आले. या विद्यार्थिनींना विद्यालयातील हिंदी शिक्षिका सौ. रोथेल लोंढे यांनी मार्गदर्शन केले होते.

विद्यालयाच्या या यशा बरोबरच हिंदी दिन ही विद्यालयात उत्साहाने साजरा करण्यात आला. हिंदी दिनाच्या निमित्ताने विद्यालयात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांसाठी फळे व भाज्यांची वेशभूषा, हस्ताक्षर, काव्य गायन, निबंध व घोषवाक्य स्पर्धा घेण्यात आल्या व त्यामध्ये विद्यार्थी सहभागी झाले होते.

या स्पर्धेमध्ये प्राथमिक वर्गातील मुले विविध फळे व भाज्यांची वेशभूषा करून आली होती. या सर्व स्पर्धांचे परीक्षण कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या संपदा देशपांडे यांनी केले. या स्पर्धा यशस्वीतेसाठी सुचिता नगरकर, कल्याणी टिक्कल, रोथेल लोंढे यांनी परिश्रम घेतले.

विद्यार्थ्यांचे विद्यालयाच्या प्राचार्या सौ. राधिका जेऊरकर, उपप्राचार्या गगन वाधवा, कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या संपदा देशपांडे, समन्वयक सुषमा उजागरे, श्रेयकुमार गुंडू यांनी अभिनंदन केले. संस्थेचे उपाध्यक्ष व शाळा समितीचे चेअरमन नंदकुमार झंवर यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून पारितोषिक दिले. अध्यक्ष श्रीगोपाल धूत, उपाध्यक्ष मोहनलाल मानधना, राजेश झंवर, सचिव डॉ. शरद कोलते, सहसचिव बजरंग दरक व संस्थेच्या इतर सभासदांनीही विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# अहिल्यानगर शहर व जिल्हा भाजपच्यावतीने पंडित दीनदयाळ उपाध्याय यांची जयंती साजरी



पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त भाजपा नगर शहर व जिल्ह्याच्या वतीने आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना प्रदेश संघटक प्रदीप पेशकर, शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, राज्य परिषद सदस्य विश्वनाथ कोरडे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

नगर – स्व.पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या १०९ व्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पक्षाच्या नगर शहर, उत्तर व दक्षिण जिल्ह्याच्या वतीने पक्ष कार्यालयात प्रदेश पदाधिकारी प्रदीप पेशकर यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, दक्षिण जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, कार्यक्रमाचे अध्यक्ष राज्य परिषद सदस्य विश्वनाथ कोरडे यांच्या सह शहरातील व जिल्ह्यातील पदाधिकारी, मंडल अध्यक्ष, माजी नगरसेवक, मोर्चा व आघाड्यांचे अध्यक्ष, जेष्ठ नेते व कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष विश्वनाथ कोरडे, अशोक गायकवाड, बाबासाहेब सानप आदींनी मनोगत व्यक्त केले.

जिल्हा सरचिटणीस महेश नामदे यांनी सूत्रसंचालन केले. सुभाष दुधाडे यांनी आभार मानले.

यावेळी विवेक नाईक, दक्षिण नगर जिल्हा सरचिटणीस चंद्रशेखर खरमुरे, काशिनाथ ठुबे, राहुल शिंदे, अजित तांबे, लक्ष्मण दुधाळे, दत्तात्रय दुधाडे, राजेंद्र फुलारे, भार्गव फुलारे, सुनील सकट, संजय गायकवाड, संतोष शिरसाठ, उदय अनभूले, मुकुल गंधे, संदीप परभणे, दीपक गावडे, प्रिया जानवे, अर्चना चौधरी, सत्याशीला खराडे, ज्योती दांडगे, साहेबराव विधाते, रामदास आंधळे, प्रकाश जोशी, ज्ञानेश्वर काळे, युवराज पोटे, संपतराव नलावडे, वसंत राठोड, बंटी दापसे, चंदन बारटक्के, सचिन पळशीकर, दिलीप जाधव, अशोक भागवत, अशोक भोसले, ज्ञानेश्वर थिरडे, युवराज गाडे, गोपाल सहदेव, बाळासाहेब भुजबळ, रवींद्र म्हसे, पल्लवी जाधव, राजू वाडेकर, संजय ढोणे, मनीष शिंदे, बाळासाहेब गायकवाड, मयूर ताठे, अरुण शिंदे, भरत ठुबे, अमोल निस्ताने, रुद्रेश अंबाडे, कैलास गर्जे, नितीन शेलार, आकाश ढोकणे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# कुस्तीमध्ये ७६ किलो गटामध्ये 'आडसूळ'ची प्रिया थोरात प्रथम



नगर – मुळा एज्युकेशन सोसायटीचे आर्ट, कॉमर्स आणि सायन्स कॉलेज सोनई येथे १८ सप्टेंबर रोजी पार पडलेल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाअंतर्गत जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत साकेश्वर ग्रामीण विकास सेवा संस्थेचे आडसूळ टेक्निकल कॅम्पस येथील द्वितीय वर्ष संगणक विभागात शिकत असणारी कु. प्रिया सोमनाथ थोरात हिने ७६ किलो वजनी गटात चार फेऱ्या जिंकत अंतिम फेरी गाठत तिने प्रथम क्रमांक मिळवला आहे. आणि २५ व २६ सप्टेंबर रोजी सोमेश्वरनगर बारामती येथे होणाऱ्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठा अंतर्गत विभागीय कुस्ती (मुली) स्पर्धेसाठी तिची निवड झाली आहे.

कॅम्पस डायरेक्टर व प्राचार्य डॉ. प्रदीप एम. पाटील यांचे मार्गदर्शन. तिने मिळवलेल्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष प्रा. अनिरुद्ध आडसूळ, संस्थेच्या सेक्रेटरी डॉ. लीना आडसूळ, संचालक कृष्णा आडसूळ, खजिनदार परमेश्वर आडसूळ, सदस्य कल्पना आडसूळ व रत्न आडसूळ,डायरेक्टर व प्राचार्य डॉ. प्रदीप एम. पाटील, अकॅडमीक डीन डॉ. ए. जे. शिर्के, डीन एक्यूएसी डॉ. अडोकार डी. यू., संगणक विभाग प्रमुख डॉ. एस. एस. खान, डीन डमिनिस्ट्रेशन गडाख आर. एस., फिजिकल डायरेक्टर ऋषिकेश भालसिंग, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी तिच्यावर कौतुकाचा वर्षाव केला.



के. जी. कला महाविद्यालयात दीनदयाल जयंती आणि एकात्म मानव दर्शन हिरक महोत्सव साजरा करण्यात आला.

# के. जी. कला महाविद्यालयात दीनदयाल जयंती आणि एकात्म मानव दर्शन हिरक महोत्सव उत्साहात साजरा

नगर – के. जी. कला व वाणिज्य महाविद्यालयात पंडित दीनदयाल उपाध्याय यांची जयंती आणि एकात्म मानव दर्शन हिरक महोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने महाविद्यालयात निबंध स्पर्धा तसेच वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून दीनदयाल उपाध्याय यांच्या 'एकात्म मानव दर्शन' या विचारधारेवर प्रकाश टाकला. महाविद्यालयाच्या परिसर संचालिका प्रा. डॉ. स्वाती मुनोत यांनी पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या प्रतिमेचे पूजन करून आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांना पंडित दीनदयाल उपाध्यायांचे विचार आजच्या पिढीला मार्गदर्शक आहेत. त्यांच्या एकात्म मानव दर्शनातून सर्वांगीण विकासाची संकल्पना पुढे येते. विद्यार्थ्यांनी अशा स्पर्धांच्या माध्यमातून विचारांची देवाणघेवाण करून समाजकार्याच्या वाटचालीसाठी प्रेरणा घ्यावी. असे मार्गदर्शन केले.

प्रा. डॉ.वर्षा कीर्तने यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.सविता चव्हाण यांनी केले. प्रा.आरती खेडकर यांनी आभार मानले.

या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्रा. स्नेहल बोरावके, सौ. हर्षाली रासकर व विद्यार्थी उपस्थित होते.

# सनातन धर्मसभेच्या अध्यक्षपदी घनपाठी महेश रेखे गुरुजी यांची निवड

## स्वागताध्यक्ष दत्तोपंत पाठक





नगर – १२५ व्या वर्षाकडे यशस्वी वाटचाल करणाऱ्या येथील सनातन धर्मसभेची त्रैवार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेच्या चतुर्वेद भवन येथे संस्थेचे अध्यक्ष वेदमूर्ती दत्तोपंत पाठक यांच्या अध्यक्षतेखाली झाली. सभासदांच्या एकमुखी ठरावाने तसेच संस्थेच्या विद्यमान कार्यकारिणी सदस्यांच्या निर्णयाने यावेळी घनपाठी महेश रेखे गुरुजी यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली. ॲड. उमेश नगरकर यांनी त्यांच्या नावाचा ठराव मांडला. त्यास निळकंठ देशमुख यांनी सर्वानुमते अनुमोदन दिले.

संस्थेचे कार्यकारी संचालक व सभासद बंडोपंत मुळे, ॲड. सुविधा तांबोळी, श्रीपाद तांबोळी, किशोर जोशी सभेस उपस्थित होते. याचवेळी पुढील पाच वर्षांसाठी कार्यकारी मंडळ त्यांनी जाहीर केले. संस्थेच्या इतिहासात प्रथमच दोन महिला भगिनींना कार्यकारी मंडळात घेण्याचा निर्णय सर्वसंमतीने घेण्यात आला.

दत्तोपंत पाठक यांनी कायमस्वरूपी स्वागताध्यक्ष म्हणून कार्य करावे, असा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. संस्थेच्या कार्यात स्थापनेपासूनच प्रा. प्रभाताई मुळे परिवाराचे मोठे योगदान आहे. त्यांच्या कार्याची दखल घेऊन प्रथम महिला संचालक म्हणून श्रीमती प्रभाताई मुळे यांची सभासदांनी सर्वानुमते नियुक्ती केली.

नवनिर्वाचित अध्यक्षांनी संस्थेच्या कार्यकारी मंडळाची निवड घोषित केली. उपाध्यक्ष– निळकंठ देशमुख, डॉ. नंदकिशोर मुळे, राजाभाऊ अमरापूरकर, मंत्री– दिनकर देशमुख, वेदमूर्ती निलेश धर्माधिकारी, रमेश देशपांडे तर खजिनदारपदी ॲड. उमेश नगरकर व कार्यकारिणीमध्ये गिरीश मुळे, मोरेश्वर मुळे, चारुदत्त मुळे, समीर उपाध्ये, राजेंद्र नगरकर, दयानंद रेखी, उमेश वाळुंजकर, चकोर मुळे, उदय वैकर, संजय उर्फ बंडोपंत धर्माधिकारी, सोमनाथ मुळे, सदानंद कुलकर्णी, पुष्कर तांबोळी, अभिजीत ऋषी, मिलिंद ऋषी यांची निवड करण्यात आली. सल्लागार म्हणून डॉ. श्रीकांत केळकर, श्रीवल्लभ जोशी, किशोर जोशी यांची निवड करण्यात आली.

सभेचे नोटीस वाचन दिनकर देशमुख यांनी केले. निळकंठ देशमुख यांनी आभार मानले.

# २६ सप्टेंबर : जागतिक पर्यावरण आरोग्य दिन शुद्ध हवा, निरोगी जीवन

दरवर्षी २६ सप्टेंबर हा दिवस जागतिक पर्यावरण आरोग्य दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचा उद्देश म्हणजे पर्यावरणाचे आरोग्यावर होणारे परिणाम याबद्दल जनजागृती निर्माण करणे, समाजात पर्यावरणीय समज वाढवणे आणि प्रत्येक व्यक्तीला आपल्या जीवनशैलीत सुधारणा करण्यासाठी प्रेरित करणे. जागतिक पर्यावरण आरोग्य दिनाची स्थापना आंतरराष्ट्रीय पर्यावरण आरोग्य महासंघ (IFEH) ने २०११ साली केली. या महासंघाने २६ सप्टेंबर हा दिवस पर्यावरणीय आरोग्याच्या महत्त्वाबद्दल जागरूकता वाढवण्यासाठी निश्चित केला. या दिवसाचे आयोजन दरवर्षी एक विशिष्ट थीमसह केले जाते, ज्याद्वारे त्या वर्षीच्या महत्त्वाच्या पर्यावरणीय आरोग्य समस्यांवर लक्ष केंद्रित केले जाते. २०२५ साली या दिवसाचे थीम आहे ती म्हणजे शुद्ध हवा, निरोगी जीवन (Clean Air, Healthy People). ही थीम आपल्याला सूचित करते की शुद्ध हवा आणि पर्यावरणीय संतुलन हा निरोगी जीवनाचा पाया आहे. आपल्याला शुद्ध हवेचे महत्त्व, वायू प्रदूषणाचे परिणाम, उपाययोजना आणि समाजाची जबाबदारी याबद्दल सविस्तर विचार करणे आवश्यक आहे.

हवेतील प्रदूषण हे मानवाच्या आरोग्यावर थेट आणि गंभीर परिणाम करणारे आहे. शुद्ध हवा नसल्यास श्वसनसंस्थेच्या रोगांचा धोका वाढतो. प्रदूषित हवेत असलेले सूक्ष्मकण फुप्फुसांमध्ये जाऊन श्वसन विकार निर्माण करतात. याशिवाय हृदयविकार, कर्करोग आणि लहान मुलांमध्ये फुप्फुसांच्या वाढीसंबंधी आजार निर्माण होण्याची शक्यता अधिक असते. गर्भवती महिलांसाठी प्रदूषित हवा गरोदरपणातील गंभीर आजार निर्माण करू शकते. त्यामुळे शुद्ध हवा ही केवळ जीवनासाठी गरज नाही, तर ती आरोग्याचे मूलभूत अधिकार सुनिश्चित करण्यासाठी अत्यावश्यक आहे.

वायू प्रदूषणाचे मुख्य स्रोत म्हणजे औद्योगिकीकरण, वाहनांचा वाढता प्रवाह, घरगुती इंधनाचा वापर, रस्ते बांधकाम आणि प्लास्टिक व इतर धातूंचे जळणे. विशेषतः भारतातील मोठ्या शहरांमध्ये प्रदूषणाची पातळी चिंताजनक आहे. दिल्ली, मुंबई, पुणे, कोलकाता यांसारख्या महानगरांमध्ये वायू प्रदूषणामुळे नागरिकांमध्ये श्वसन विकार, हृदयविकार आणि अलर्जी सारखे आजार वाढले आहेत. प्रदूषित हवेतील धूळ आणि विषारी वायू फुप्फुसातील पेशींवर दीर्घकालीन परिणाम करतात, ज्यामुळे लोकसंख्येतील आरोग्याची गुणवत्ता कमी होते.

पर्यावरणीय आरोग्याच्या दृष्टीने केवळ प्रदूषण कमी करणे पुरेसे नाही; आपण जीवनशैलीत बदल करूनही वातावरण स्वच्छ ठेवू शकतो. वाहतुकीसाठी सार्वजनिक वाहने, सायकलींग किंवा चालणे यांचा वापर केल्यास हवेतील प्रदूषण कमी होऊ शकते. औद्योगिक क्षेत्राने स्वच्छ तंत्रज्ञानाचा वापर करून उत्सर्जनावर नियंत्रण ठेवावे. घरगुती स्तरावर, पारंपरिक इंधनाऐवजी गॅस किंवा सौर ऊर्जा वापरणे आरोग्यासाठी फायदेशीर ठरते. वृक्षारोपणाचे महत्त्वही यामध्ये विशेष आहे; वृक्ष हवेतील कार्बन डायऑक्साईड शोषतात, ऑक्सिजनचे प्रमाण वाढवतात व हवेतले विषारी घटक कमी करतात.

भारत सरकारने या क्षेत्रात विविध योजना राबविल्या आहेत. 'स्वच्छ भारत अभियान' आणि 'राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम' यांसारख्या उपाययोजनांमुळे प्रदूषणावर काही प्रमाणात नियंत्रण मिळाले आहे. तथापि, यशस्वीतेसाठी नागरिकांचा सहभाग आणि औद्योगिक क्षेत्रातील जबाबदारी अनिवार्य आहे. नागरी भागातील वाहतूक व्यवस्थेची सुधारणा, सार्वजनिक वाहने अधिक कार्यक्षम बनवणे, आणि औद्योगिक उत्सर्जनाच्या नियंत्रणासाठी कठोर नियम लादणे हे उपाय अत्यंत आवश्यक आहेत.

हवेच्या स्वच्छतेसाठी केवळ सरकार आणि औद्योगिक क्षेत्र जबाबदार नाहीत; तर प्रत्येक नागरिकाने यामध्ये आपला सहभाग देणे आवश्यक आहे. वाहनांची देखभाल, प्लास्टिक वगळणे, ऊर्जा बचत करणाऱ्या उपायांचा अवलंब, आणि घरगुती प्रदूषण कमी करणे या गोष्टी आपण आपल्या दैनंदिन जीवनात करू शकतो. याशिवाय, शालेय स्तरावर पर्यावरणीय शिक्षण देणे आणि तरुण पिढीमध्ये जनजागृती वाढवणे हे देखील महत्त्वाचे आहे. समाजातील प्रत्येक घटकाने मिळून काम केल्यास शुद्ध हवा आणि निरोगी जीवनाची सुनिश्चितता होऊ शकते. वायू प्रदूषणापेक्षा हवेतील सूक्ष्मकणांचे आरोग्यावर होणारे परिणाम सर्वाधिक गंभीर आहेत. हे कण फुप्फुसांत प्रवेश करून दीर्घकालीन आजार निर्माण करतात. विशेषतः प्रदूषित हवेत वाढणारी रासायनिक वायूंची मात्रा हृदयविकार, उच्च रक्तदाब, आणि अल्झायमर सारख्या रोगांना प्रोत्साहन देते. त्यामुळे शुद्ध हवा, निरोगी जीवन हे विषयाकेंद्रित संदेश केवळ तात्पुरता नाही तर दीर्घकालीन आरोग्याचे आव्हान आहे.

जागतिक स्तरावर, अनेक देशांनी पर्यावरणीय आरोग्य सुधारण्यासाठी विविध धोरणे आखली आहेत. विकसित देशांमध्ये औद्योगिकीकरण, वाहतूक, आणि ऊर्जा वापरावर नियंत्रण ठेवण्यासाठी काटेकोर नियम आहेत. भारतातील परिस्थिती तुलनेने गंभीर आहे कारण येथील जलद शहरविकास, वाहतुकीची वाढ, आणि औद्योगिकीकरण हवेतील प्रदूषण वाढविते. यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर दीर्घकालीन परिणाम होत आहेत. त्यामुळे जागतिक आरोग्य संघटनेने प्रत्येक देशाला आपापल्या परिस्थितीप्रमाणे उपाययोजना राबवण्याचे आवाहन केले आहे.

जागतिक पर्यावरणीय आरोग्य दिन हा दिवस नागरिकांना फक्त जागरूक करण्यापुरता मर्यादित नाही; हा दिवस एक सक्रिय भूमिका घेण्याची प्रेरणा देतो. आपण आपल्या घरगुती व औद्योगिक जीवनशैलीत बदल करून प्रदूषण कमी करू शकतो. सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढवणे, ऊर्जा बचतीची साधने वापरणे, वृक्षारोपण करणे आणि प्रदूषण निर्मितीची पातळी कमी करणे या उपाययोजना प्रत्येकासाठी उपयुक्त आहेत. याशिवाय, शहरांमध्ये हरित पट्ट्यांचा विकास करणे आणि प्रदूषण मोजण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे देखील आवश्यक आहे.

शुद्ध हवा ही फक्त पर्यावरणीय आवश्यकता नाही; ती निरोगी जीवनाची हमी आहे. शुद्ध हवेमुळे श्वसन विकार, हृदयविकार, आणि मानसिक आरोग्य सुधारण्यास मदत होते. याशिवाय, संतुलित पर्यावरणामुळे जीवनशैली निरोगी राहते आणि सामाजिक आरोग्यही टिकते. शुद्ध हवा, निरोगी जीवन ही थीम आपल्याला सांगते की आरोग्य आणि पर्यावरण यांचे आयुष्यातील संबंध अतिशय घट्ट आहेत. शेवटी असे म्हणता येईल की, जागतिक पर्यावरण आरोग्य दिन हा दिवस आपल्याला आपल्यातील जबाबदारीची आठवण करून देतो. सरकार, औद्योगिक क्षेत्र, आणि नागरिकांनी मिळून उपाययोजना राबवल्या पाहिजेत. स्वच्छ हवा, सुरक्षित वातावरण, आणि निरोगी जीवन यासाठी प्रत्येकाने आपले योगदान द्यायला हवे. शुद्ध हवा आणि पर्यावरणीय संतुलन याशिवाय निरोगी जीवनाची कल्पनाच अशक्य आहे. या दिवसाच्या निमित्ताने आपण सर्वांनी एकत्र येऊन पर्यावरणाचे रक्षण करणे आणि आपल्या जीवनशैलीत सुधारणा करणे आवश्यक आहे.



**– डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)



छावणी परिषदच्या वतीने भिंगारमध्ये स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

## छावणी परिषदच्या वतीने भिंगारमध्ये स्वच्छता अभियान

**स्वच्छता हीच सेवा! उपक्रमातंर्गत केली स्वच्छता; प्लास्टिक मुक्तीचा संदेश**

नगर – भिंगार छावणी परिषदच्या वतीने स्वच्छता ही सेवा! अभियानातंर्गत भिंगार शहरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानाद्वारे प्लास्टिक मुक्तीचा संदेश देऊन, नागरिकांमध्ये सार्वजनिक स्वच्छतेबद्दल जागृती करण्यात आली.

या स्वच्छता अभियानात भिंगार छावणी परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रांत मोरे व नामनिर्देशित सदस्य वसंत राठोड यांनी हातात झाडू घेऊन सहभाग घेतला. त्यांच्या सोबत कार्यालय अधिक्षक स्नेहा पारनाईक, वरिष्ठ स्वच्छता निरीक्षक रमेश साके, गणेश भोर स्वच्छाता निरिक्षक, लेखापाल सुनिल शिंदे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. गीतांजली पवार, मुख्याध्यापक संजय शिंदे, ठेकेदार राजेश काळे, तसेच छावणी परिषदेच्या विविध विभागातील अधिकारी-कर्मचारी, सर्व सफाई कर्मचारी, हरदिन मॉर्निंग ग्रुपचे सर्व सदस्य, नागरिक तसेच विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी यांनी सक्रिय सहभाग घेतला.

भिंगार छावणी परिषदेच्या वतीने १९ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर रोजी या कालावधीत स्वच्छता ही सेवा! अभियान सुरू आहे. त्यानुसार २५ सप्टेंबर रोजी शहरातील प्रमुख ठिकाणी स्वच्छता मोहिम राबविण्यात आले. या अंतर्गत नगर तालुका पोलीस स्टेशन परिसर, शुक्रवार बाजार परिसर व इतर सार्वजनिक ठिकाणी साफसफाई करण्यात आली.

नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने साथीचे आजार टाळण्यासाठी सार्वजनिक ठिकाणांची नियमित स्वच्छता, नालेसफाई व औषध फवारणी यासारखी कामेही छावणी परिषदेच्या माध्यमातून सातत्याने सुरू आहेत. हे अभियान यशस्वी करण्यासाठी छावणी परिषदेचे सर्व कार्यालयीन कर्मचारी, शालेय कर्मचारी, रुग्णालयातील कर्मचारी यांच्यासह स्थानिक स्वयंसेवी संस्था, सामाजिक संघटनांनी परिश्रम घेतले.

## छावणी परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी पथनाट्यातून केला स्वच्छतेचा जागर



पथनाट्यातून स्वच्छतेचा जागर सादर करताना छावणी परिषद शाळेतील विद्यार्थी.

नगर – छावणी परिषदेच्या वतीने 'स्वच्छता ही सेवा' या उपक्रमांतर्गत मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रांत मोरे, मनोनीत सदस्य वसंत राठोड, स्वच्छता निरीक्षक रमेश साके व गणेश भोर यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यासाठी विविध कार्यक्रम राबवले जात आहेत. या माध्यमातून नागरिकांमध्ये स्वच्छतेची भावना दृढ करण्यावर विशेष भर दिला जात आहे.

याचाच एक भाग म्हणून छावणी परिषदेच्या पीएमश्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळेतील विद्यार्थ्यांनी शुक्रवार बाजार येथे पथनाट्याद्वारे स्वच्छतेचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला. हा उपक्रम सीएसआरडीचे प्राध्यापक सॅम्युअल वाघमारे व मुख्याध्यापक संजय शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

या पथनाट्यात सिएसआरडी महाविद्यालयाचे विद्यार्थी श्रुती थोरात, पवन गोरे, संकेत केदारी, प्रज्ञा साळवे, नेहा शेटे, सम्शा खातून यांच्यासह पीएमश्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळेचे विद्यार्थी सिफत शेख, मसिरा शेख, हर्षदा जाधव, स्लालेहा सय्यद, सायमा शेख, दिव्या जगताप, सिमरन खान, गायत्री शिंदे, अर्पिता शेंडे, ढोलकी वादक ओंकार वाघमारे व सोहम शेंडगे सहभागी झाले होते. काळू हिले, प्रशांत आठवाल, मायकल बनसोडे यांनी सहकार्य केले.

विद्यार्थ्यांनी प्रभावी अभिनय, संवाद आणि घोषणांद्वारे परिसर स्वच्छतेचे महत्त्व, घाण न करण्याचे फायदे, कचरा व्यवस्थापनाचे नियम तसेच स्वच्छतेतून आरोग्य जपण्याचा संदेश जनतेपर्यंत पोहोचवला. पथनाट्याचे सादरीकरण पाहणाऱ्यांनी उत्स्फूर्त दाद दिली. अनेक नागरिकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक बदल घडतो असे मत व्यक्त केले.

छावणी परिषदेकडून स्वच्छता पंधरवाड्यात स्वच्छता अभियानाशी निगडीत विविध उपक्रम राबवले जाणार असून विद्यार्थ्यांचा यात सक्रिय सहभाग राहणार आहे.

## डॉक्टरला साडेपाच लाख रुपये नुकसान भरपाईची व एक महिना सक्त मजुरीची शिक्षा

नगर – अहमदनगर येथील अतिरीक्त चिफ ज्युडिशियल मॅजि. एम. ए. एम. हुसेन यांनी डॉ.रामेश्वर विठ्ठलराव बंडगर (रा. स्वामीनी हॉस्पीटल, कृष्णकुंद बिल्डिंग, सासवड रोड, पुणे) यांस निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट कलम १३८ मध्ये एक महिन्याच्या सक्त मजुरीची शिक्षा व ५,५०,००० रु.आरोपीस दंड केला. नुकसान भरपाईची रक्कम एक महिन्याच्या आत न दिल्यास सहा महिन्याची सक्त मजुरीची शिक्षा सुनावलेली आहे. नुकसान भरपाईची रक्कम फिर्यादी मनोहर बाबुराव निगुडे रा. चिपाडे मळा, सारसनगर, अ.नगर यांना देण्याबाबतचा आदेश झाला आहे.

मनोहर बाबुराव निगुडे यांच्याकडुन आरोपी यांनी बोल्हेगाव फाटा येथील काकासाहेब म्हस्के कमानीजवळ सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये २१० चौ.फुटाचा मेडीकल दुकानसाठी गाळा देण्याचे कबुल करुन २०.०५.२०२२ रोजी रु.४,९०,००० ॲडव्हान्स म्हणुन घेतले होते. परंतु तपासाअंती सदर आरोपीचे कुठल्याही प्रकारचे हॉस्पिटलचे बांधकाम चालु अथवा प्रस्तावित नसल्याचे निदर्शनास आल्यानंतर फिर्यादी मनोहर बाबुराव निगुडे यांनी आरोपी डॉ. रामेश्वर बंडगर यांच्याकडुन ॲडव्हान्स दिलेल्या रकमेची मागणी केली असता आरोपीने फिर्यादीस २५.०६.२०२२ रोजीचा आयसीआयसीआय बँक शाखा केडगाव चा चेक नं.०००३०४ रक्कम रु.४,९०,००० चा दिला होता व तो वटण्याची हमी दिली म्हणुन फिर्यादीने सदरचा चेक त्यांचे खात्यात भरला असता तो न वटता परत आला म्हणुन आरोपी डॉ. बंडगर यांचे विरुध्द एम.ए.एम. हुसेन यांचे न्यायालयात निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट कलम १३८ प्रमाणे केस दाखल केली होती. फिर्यादी तर्फे ॲड. ए. बी. भालसिंग यांनी काम पाहिले होते.

## आयकर कायद्यातील तरतुदी व हिशेब पत्रके विषयावर अहिल्यानगर येथे २९ सप्टेंबरला जनजागृती कार्यक्रम

नगर –भारतीय सनदी लेखाकार संस्थान व धर्मादाय उप आयुक्त कार्यालयाच्या वतीने आयकर कायद्यातील तरतुदी व हिशेब पत्रके याबाबत आयसीएआय भवन बुरुडगाव रोड, अहिल्यानगर येथे २९ सप्टेंबर रोजी सायंकाळी ४ वाजता जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील धर्मादाय पदाधिकारी, विश्वस्त, कर्मचाऱ्यांनी अधिकाधिक संख्येने या कार्यक्रमास उपस्थित रहावे, असे आवाहन धर्मादाय उपायुक्त न.वा.जगताप यांनी केले आहे.

न्यास नोंदणी कायद्यातील तरतुदीवर तसेच आयकर अधिनियमातील तरतुदीवर कार्यक्रमात तज्ज्ञांमार्फत मार्गदर्शन केले जाणार आहे. धर्मादाय संस्था चालवित असताना होणाऱ्या सामान्य चुका व त्यांना टाळण्याचे मार्ग स्पष्ट केले जाणार आहे. तसेच सहभागींच्या शंकांचे निरसनही करण्यात येणार आहे.

## मांडवगण गटातील गावांची आयुर्वेद वनस्पतींची गावे म्हणून वेगळी ओळख निर्माण करू

**सचिन जगताप यांचे प्रतिपादन; गुणे आयुर्वेद रुग्णालयात १० वा राष्ट्रीय आयुर्वेद दिन उत्साहात साजरा**

नगर – भारतीय आयुर्वेदीय उपचार पद्धती ही जगात सर्वश्रेष्ठ आहे. आयुर्वेद औषधांना मोठ्या प्रमाणात मागणी असून त्यामानाने उपलब्धता व पुरवठा कमी आहे. त्यामुळे औषधांमध्ये मोठ्या प्रमाणात भेसळीचे प्रमाण वाढले आहे. रुग्णांना दर्जेदार व शुद्ध आयुर्वेदीक औषधे मिळावेत यासाठी गुणे आयुर्वेद महाविद्यालयाच्या फामर्सी मध्ये शुद्ध व दर्जेदार आयुर्वेदिक औषधांची निर्मिती केली जाणार आहे. यासाठी मांडवगण गटातील गावांमधील शेतकऱ्यांना मोफत आयुर्वेद वनस्पतींची झाडे दिली जाणार असून या सर्व शेतकऱ्यांकडून आयुर्वेदिक औषधांसाठी कच्चामाल खरेदी केला जाणार आहे. या आयुर्वेद वनस्पतींच्या संगोपनाचे प्रशिक्षण गुणे आयुर्वेद महाविद्यालयातील प्राध्यापक शेतकऱ्यांना देणार आहेत. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना अतिरिक्त उत्पन्न मिळून आर्थिक फायदाही होणार आहे. या अनोख्या उपक्रमामुळे मांडवगण गटातील १९ गावांची आयुर्वेद वनस्पतींची गावे म्हणून वेगळी ओळख निर्माण करू, असे प्रतिपादन आयुर्वेद शास्त्र सेवा मंडळाचे अध्यक्ष सचिन जगताप यांनी केले.

अहिल्यानगरच्या गंगाधरशास्त्री गुणे आयुर्वेद रुग्णालय व महाविद्यालयाच्या वतीने १० व्या राष्ट्रीय आयुर्वेद दिना निमित्त आयोजित प्रदर्शनाचे उद्घाटन व आयुर्वेद वनस्पतींच्या वाटपाचा शुभारंभ सचिन जगताप यांच्या हस्ते झाले.

यावेळी आयुर्वेद शास्त्र सेवा मंडळाचे संचालक रत्नाकर कुलकर्णी, वैशाली ससे, ज्ञानेश्वर रासकर, गुणे आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दत्तात्रय लोडे, उपप्राचार्य डॉ.




गंगाधरशास्त्री गुणे आयुर्वेद रुग्णालयात व महाविद्यालय १० व्या राष्ट्रीय आयुर्वेद दिनानिमित्त आयोजित प्रदर्शनाचे उद्घाटन व आयुर्वेद वनस्पतींच्या वाटपाचा शुभारंभ करताना संस्थेचे अध्यक्ष सचिन जगताप.

सुरज ठाकूर, मनापा अभियंता परिमल निकम, प्रतिभा भारदे, वैद्यकीय अधिकारी डॉ.समीर होळकर, माजी प्राचार्य डॉ.संगीता निंबाळकर आदींसह सर्व प्राध्यापक व प्रशिक्षित डॉक्टर विद्यार्थी उपस्थित होते. यानिमित्त महाविद्यालयाच्या आवारात आयुर्वेद उपकरणांची व उपचारांची माहिती देणाऱ्या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात मांडवगण गटातील १९ ग्रामपंचायतींना आयुर्वेद वनस्पतींच्या वाटपाचा शुभारंभही करण्यात आला. सर्व ग्रामपंचायतींचे सरपंच व पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

सचिन जगताप पुढे म्हणाले, स्व. अरुणकाका जगताप यांनी शेतकऱ्यांना कायम मदत करून त्यांच्यासाठी काय करता येईल याचाच विचार केला. त्यांच्याच विचारावर पुढे काम करून शेतकऱ्यांसाठी वेगवेगळ्या उपाययोजना राबवण्याचा प्रयत्न माझा आहे. गुणे आयुर्वेद रुग्णालय व महाविद्यालय संस्थेच्या माध्यमातून मांडवगण गटातील १९ ग्रामपंचायतींमधील शेतकऱ्यांच्या बांधावर एक हजार आयुर्वेद वनस्पतींची झाडे लावून ते संगोपन व वाढवण्याचा उपक्रम सुरू करत आहोत. एका गावात एकाच प्रकारच्या आयुर्वेद वान्स्पपातींची एक हजार झाडे मोफत देणार आहोत.

प्रास्ताविकात प्राचार्य डॉ.दत्तात्रय लोडे यांनी १० व्या राष्ट्रीय आयुर्वेद दिना निमित्त राबवण्यात आलेल्या उपक्रमांची माहिती दिली.

यावेळी उपस्थित मांडवगण गटातील विविध गावांच्या सरपंच व पदाधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.रुपाली म्हसे व डॉ.संगीता निंबाळकर यांनी केले. डॉ. सुरज ठाकूर यांनी आभार मानले.

## वंचित बहुजन आघाडीचे माजी जिल्हाध्यक्ष प्रतीक बारसे यांचा ठाकरे शिवसेनेत प्रवेश



वंचित बहुजन आघाडीचे माजी जिल्हाध्यक्ष प्रतीक बारसे यांचा शिवसेनेत प्रवेश केल्यावर त्यांचे स्वागत करताना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे आदी.

नगर –वंचित बहुजन आघाडीचे माजी जिल्हाध्यक्ष प्रतीक बारसे यांनी शिवबंधन हाती बांधत कार्यकर्त्यांसह अहिल्यानगर शहरप्रमुख किरण काळे यांच्या नेतृत्वाखाली मुंबईतील मातोश्री येथे पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला.

सध्याच्या अस्थिर राजकीय वातावरणात पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचे हात बळकट करण्यासाठी आणि शहर प्रमुख किरण काळे यांच्या मागे खंबीरपणे उभे राहणे गरजेचे असल्याची भावना होताच हा निर्णय घेतल्याचे प्रतीक बारसे यांनी स्पष्ट केले. त्यांनी शिव, शाहू, फुले, आंबेडकर व अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांना अनुसरून आजवर आंबेडकरी चळवळीत कार्य केले आहे.

या पक्षप्रवेशावेळी खासदार संजय राऊत, विनायक राऊत, शहर प्रमुख किरण काळे, अनिस चुडिवाल, सुनिल भोसले, विलास उबाळे, ओंकार वडे, अभिषेक बारसे, धरम परदेशी, प्रविण पवार, अमोल कारंडे, नदीम शेख, अंबादास सोले, सचिन वाघमारे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

## सावेडी ज्येष्ठ नागरिक मंचातर्फे ऋषीतुल्य व्यक्तींचा सत्कार



सावेडी ज्येष्ठ नागरिक मंचातर्फे डॉ. दिलीप धनेश्वर व ह. भ प. प्रभाताई भोंग या ऋषीतुल्य व्यक्तींच्या सत्कार करण्यात आला. यावेळी अध्यक्ष शरद कुलकर्णी, ज्योती केसकर, पुष्पा चितांबर, चारुशीला करवंदे, स्नेहल वेलनकर, शुभदा जहागीरदार, बलभिम पांडव, मोरेश्वर मुळे, आदिनाथ जोशी, बाजीराव जाधव, एस. आर. जोशी, सर्वोत्तम क्षीरसागर, अच्युत पिंगळे, विणाताई धनेश्वर आदी. (छाया – हेमंत ढाकेफळकर)

नगर – राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अनेक संस्था आहेत. त्यामध्ये आरोग्य भारती, जनकल्याण रक्तपेढी, संस्कार भारती, कुटुंब प्रबोधन संस्था आदिवासींची वस्तीगृह इत्यादी. समाजसेवे बरोबरच अगदी सामान्यतला सामान्य माणूस संस्कारीत करून त्यांना सेवाकार्याच्या प्रवाहात आणणे, कार्यकर्ते निर्माण करणे ही संघाची उद्दिष्टे राहिलेली आहेत. मी सुद्धा एक साधा सेवा कार्यकर्ता असून तुम्ही सुद्धा समाजासाठी सेवा कार्य करायला हरकत नाही, असे प्रतिपादन डॉ.दिलीप धनेश्वर यांनी केले.

सावेडी ज्येष्ठ नागरिक मंचातर्फे डॉ. दिलीप धनेश्वर व ह. भ प. प्रभाताई भोंग या ऋषीतुल्य व्यक्तींच्या सत्कार करण्यात आला.

यावेळी हभप. प्रभाताई भोंग म्हणाल्या की, सत्कार म्हणजे स्वतःला आकार देणे. माझ्या सद्गुरू मुळे मी अध्यात्मक क्षेत्रात आले. संत हे स्वर्गलोकीचे ईश्वर आहेत म्हणून संतांच्या सहवासात राहावे. सद्गुरू शिवाय मानवाला पर्याय नाही. माणूस जन्म हा दुर्लभ आहे तेव्हा या जन्मात आपण सत्कर्म व भक्ती करून मोक्ष मिळवू शकतो. प्रयत्न केल्याने सर्व साध्य होते आणि त्यालाच परमेश्वर सहाय्य करतो.

डॉ. दिलीप धनेश्वर यांच्या परिचय एस आर जोशी यांनी करून दिला तर ह. भ. प. प्रभाताई भोंग यांचा परिचय पुष्पाताई चितांबर यांनी करून दिला. समाजकार्य, अध्यात्म क्षेत्र, राजकीय क्षेत्रात संस्कार वर्ग या सर्व क्षेत्रात निस्वार्थपणे कार्य करणाऱ्यांचा दरवर्षी मंचातर्फे ऋषीतुल्य पुरस्कार देऊन सन्मान केला जातो.

यावेळी मंचाचे कार्यकारणी, सदस्य उपस्थित होते. यावेळी सभासदांचे वाढदिवस साजरा करण्यात आला. सूत्रसंचालन पुष्पा कोरे यांनी केले. हर्षवर्धन थिगळे यांनी आभार मानले. श्रुती आंधळे यांच्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.


विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## स्वर्गलोकीची पायवाट

सध्या सोशल मीडियावर एक असा व्हिडीओ व्हायरल होत आहे, जो पाहताच अनेक नेटकऱ्यांनी हा स्वर्गाचाच जायचा रस्ता असल्याचंही म्हटलं आहे. पुराणकथा आणि अनेक दंतकथांमध्येही उल्लेख असल्यानुसार स्वर्ग प्रत्यक्षात खूप सुंदर असून, या जागेची भव्यता अवाक् करणारी आहे. म्हणूनच जेव्हा केव्हा एखाद्या सुरेख ठिकाणी भेट देण्याचा आणि ते ठिकाण प्रत्यक्षात पाहण्याची संधी मिळते, तेव्हा त्या ठिकाणाला स्वर्गाची उपमा दिली जाते. जणूकाही अशा या स्वर्गात जाणाऱ्या या वाटेचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे.

व्हायरल होणाऱ्या या व्हिडीओमध्ये बर्फाच्छादित पर्वतामधील एका महाकाय भुयारातून एक मार्ग प्रकाशझोताच्या दिशेनं जाताना दिसतो. ही वाट जसजशी पुढे जाते तसतसा प्रकाश वाढत जातो आणि पाहता पाहता शेवटी लख्ख, डोळे दीपवणारा प्रकाश नजरेस पडतो. प्रत्यक्षात हा स्वर्गाकडे जाणारा रस्ता नसला तरीही त्याला तशी उपमा उपलब्ध माहितीनुसार हा आईसलँडमधील बर्फाच्छादित ग्लेशिअरचा असून, त्यामध्ये तयार झालेल्या भुयारातून एक व्यक्ती पुढे जाताना दिसते. एखादी चमत्कारी जागा असावी, अगदी तसंच हे आईस टनेल आहे असं म्हणणं वावगं ठरणार नाही. प्रत्यक्षात अशा एखाद्या ठिकाणी जाणं अनेकांना शक्य होत नसलं, तरीही हा व्हिडीओ मात्र ही मंडळी वारंवार पाहून प्रत्येक वेळी भारावून जात आहेत. बर्फाच्छादित प्रदेशात



एका डोंगरा तयार झालेलं हे भुयार आणि हा कमाल व्हिडीओ नेटकऱ्यांना कमालीचा आवडला असून, तो अनेकांनी शेअरही केला आहे. अर्थात, ग्लेशियरमधील अशा बोगद्यातून जाणे अनेक वेळा धोकादायकही ठरू शकते. जर बर्फ कोसळला तर ही वाट खरोखरच स्वर्गाची वाट होऊ शकते !

## सौदी अरेबियाच्या ओएसिसमध्ये चार हजार वर्षांपूर्वीचे छोटे शहर

सौदी अरेबियातील खैबर ओएसिसमध्ये ४,४०० वर्षांपूर्वीच्या छोट्या शहराचे अवशेष आढळून आले आहेत. त्यावरून असे दिसून येते की, या परिसरातील कांस्ययुगामधील लोक इजिप्त व मेसोपोटामियामधील समकालीन लोकांच्या तुलनेत मोठी शहरे वसवण्याबाबत अग्रेसर नव्हते.

पश्चिम सौदी अरेबियातील हेजाझ परिसरातील अल-उला शहराजवळ पुरातत्त्व संशोधकांना या प्राचीन शहराचे अवशेष सापडले आहेत. त्याला त्यांनी 'अल-नताह' असे नाव दिले आहे. या मानवी वसाहतीने दीड हेक्टरची जागा व्यापलेली आहे. त्यामध्ये मध्यवर्ती वसाहत व त्याभोवतीने वसलेली दुय्यम वसाहत आणि त्याच्याही बाहेर संरक्षणात्मक यंत्रणा अशी रचना आहे. इसवी सनपूर्व २४०० मधील या छोट्याशा शहरात केवळ पाचशे लोक राहत असावेत, असा अंदाज आहे. याबाबतच्या संशोधनाची माहिती 'प्लोस वन' या नियतकालिकात प्रसिद्ध करण्यात आली आहे. या ठिकाणी मोठ्या संख्येने मातीची भांडी व दगडी जाते मिळाले आहे. तसेच मातीच्या किमान ५० घरांचे अवशेष सापडले आहेत. वसाहतीच्या मध्यवर्ती भागात दोन इमारतींचे अवशेष आहेत. कदाचित



या इमारतींचा वापर प्रशासकीय कामासाठी केला जात असावा. मध्यवर्ती भागाच्या पश्चिमेस दफनभूमी आढळली. त्या ठिकाणी मोठ्या आकाराची व उंच थडगी दिसून आल्या. या ठिकाणी लेखनकलेचे नमुने आढळले नाहीत, असे फ्रेंच नॅशनल सेंटर फॉर सायंटिफिक रिसर्चचे पुरातत्त्व संशोधक गिलौम चार्लौक्स यांनी सांगितले.

## 'दरवाजा' उघडणार, रहस्ये उलगडणार!

इजिप्त... असं नाव घेतलं की डोळ्यासमोर येतात पिरॅमिड. इजिप्तचे हजारो वर्षांपूर्वीचे हे पिरॅमिड संपूर्ण जगासाठी मोठं रहस्य आहे. इजिप्तच्या पिरॅमिड संदर्भातील अनेक रहस्य अद्याप उलगडलेली नाहीत. यापैकीच एक आहे ते साहुराचा पिरॅमिड. साहुरा पिरॅमिडमधील एका खोलीचा दरवाजा ४४०० वर्षांनंतर उघडणार आहे. या बंद दरवाजाआड दडलेली अनेक रहस्य उलगडणार आहेत. इजिप्शियन फेरो (राजा) साहुरा याच्यासाठी सुमारे ४४०० वर्षांपूर्वी हा पिरॅमिड बांधला होता. या रहस्यमयी पिरॅमिडमधील बंद असलेली खोली उघडण्यात येणार आहे. यामुळे पिरॅमिडचे संरचनात्मक मूळ आणि पिरॅमिडच्या आत फेरो साहुरा संदर्भातील अनेक रहस्य उलगडणार असल्याचा दावा संशोधकांनी केला




आहे. ज्युलियस-मॅक्सिमिलियन्स-विद्यापीठाची एक टीम साहूराच्या पिरॅमिडबाबत संशोधन करत आहे. साहुरा पिरॅमिडवर संशोधन करणाऱ्या टीमने या पिरॅमिडमधील गुप्त दरवाजे शोधले आहेत. ३डी लेझर स्कॅनिंग आणि क्षेत्राचे नकाशे यांच्या मदतीने ते पिरॅमिडच्या आत असलेल्या आठ खोल्यांपैकी एक गुप्त मार्ग उघडण्याचा प्रयत्न करत आहेत. या गुप्त दरावाजाआड अनेक रहस्य दडलेली आहेत. हे गुप्त दरवाजे उघडल्यास साहुरा पिरॅमिडशी संबंधित अनेक रहस्य उलगडण्यास मदत होणार आहे. इजिप्तच्या पिरॅमिडमध्ये राजा महाराजांच्या ममी जतन करण्यात आल्या आहेत. इजिप्तमध्ये राजा-राणी किंवा संपन्न घराण्यातील व्यक्तींचे मृतदेह विशिष्ट रासायनिक प्रक्रिया करून कायमस्वरुपी जतन करून ठेवले जायचे. याला 'ममी' म्हणतात. अभ्यासक ममीफिकेशन, त्याचा धार्मिक विधी, पद्धती आणि वेगवेगळ्या टप्प्यांबाबत अजूनही संशोधन

## टाकाऊ प्लास्टिकपासून कृत्रिम इंधन



प्लास्टिकच्या कचऱ्याची समस्या जगभरातील काही गंभीर समस्यांपैकी एक आहे. प्लास्टिकचे पाण्यात किंवा मातीत लवकर विघटन होत नाही व ते नष्ट होण्यासाठी शेकडो वर्षे लागतात. त्यामुळे जमिनीवर किंवा नदी-समुद्रात साठलेला असा कचरा पर्यावरणासाठी तसेच सजीवांसाठी हानिकारक ठरतो. त्यामुळे अशा टाकाऊ प्लास्टिकची विल्हेवाट कशी लावावी, याबाबत सातत्याने संशोधन होत असते. भारतात हैदराबाद येथेही असेच एक संशोधन झाले. येथील सतीशकुमार या मेकॅनिकल इंजिनिअरने संशोधनाद्वारे अशाच प्रकारे प्लास्टिकच्या पुनर्वापराचा एक पर्याय शोधला आहे. टाकाऊ प्लास्टिकपासून इंधननिर्मिती केल्याचा दावा त्यांनी केला आहे. त्यांनी पुनर्वापरासाठी अनेकदा प्रक्रिया केल्यानंतर आणखी प्रक्रिया न होऊ शकणाऱ्या टाकाऊ प्लास्टिकपासून कृत्रिम इंधन तयार केले आहे.



सतीशकुमार यांच्या म्हणण्यानुसार, या टाकाऊ प्लास्टिकपासून इंधननिर्मितीसाठी केवळ तीन टप्प्यांतील रिव्हर्स इंजिनिअरिंगची प्रक्रिया वापरण्यात आली आहे. यासाठी टाकाऊ प्लास्टिक हे अप्रत्यक्षपणे निर्वात पोकळीत तापवले जाते, त्याला डिपॉलमराईज्ड करून वायुरूपात आल्यानंतर ते पुन्हा घनरूपात आणले जाते. त्यानंतर त्यावर विशिष्ट प्रक्रिया करून द्रवरूपात इंधन म्हणून वापरण्यात येते. कुमार यांनी सांगितले की, अशा प्रकारे टाकाऊ प्लास्टिकपासून इंधननिर्मितीसाठी त्यांनी २०१६ मध्ये युनिटची निर्मिती केली. त्यानंतर त्यांनी ५० टन प्लास्टिक संपवले. यासाठी त्यांनी प्रामुख्याने स्वयंसेवी संस्थांनी गोळा केलेले तसेच मोठ्या प्रमाणावर पुनर्वापर केल्यानंतर टाकाऊ प्लास्टिकचा साठा शिल्लक असणाऱ्या कंपन्यांकडून त्यांनी हे प्लास्टिक मिळवले. या इंधननिर्मितीनंतर त्यांनी ते स्थानिक कंपन्यांना ४० ते ५० रुपये प्रतिलिटर या दरात विकले. बेकरी उद्योगांनाही त्यांनी हे इंधन विकले, बेकरी पदार्थ भाजण्यासाठी भट्ट्यांमध्ये या इंधनाला मोठी मागणी आहे.

## सर्वांत वेगानं वाढणारा गहू


आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानाचा नेहमीच पिकांचे उत्पादन वाढवण्यासाठीही मोठा उपयोग झालेला आहे. 'नासा' या अमेरिकन अवकाश संस्थेच्या संशोधनावर आधारित तंत्रज्ञानाच्या मदतीने ऑस्ट्रेलियातील वैज्ञानिकांनी जगातील सर्वात जास्त वेगाने वाढणारी गव्हाची प्रजातीही विकसित केलेली आहे. त्यामुळे गव्हाचे उत्पादन तीनपटींनी वाढू शकते. नासाच्या प्रयोगात रोपे सतत सूर्यप्रकाशात राहतात. यात रोपांची वाढ खूप झपाट्याने होते.

ऑस्ट्रेलियातील क्वीन्सलँड विद्यापीठातील ली हिकी या संशोधकाने सांगितले, की जलद वाढ तंत्र वापरताना त्यात गहू, चवळी व बार्ली यांची सहा पिढ्यांतील रोपे, तर कॅनोलाची चार पिढ्यांतील रोपे एका वर्षात वाढवण्यात आली. यात विशिष्ट प्रकारचे काचगृह वापरण्यात आले होते. नियंत्रित वातावरणात वाढवण्यात आलेल्या प्रयोगात सूर्यप्रकाश भरपूर ठेवला होता. २०५० पर्यंत जगात अन्नधान्य उत्पादनात ६० ते ८० टक्के वाढ केली तरच लोकांना अन्न मिळू शकणार आहे. त्यामुळे उत्पादनवाढीच्या या प्रयोगाला महत्त्व आहे. २०५०पर्यंत जगाची लोकसंख्या ९ अब्ज असणार आहे. अधिक वेगाने वनस्पतींची वाढ करण्याचे प्रयोग हे संशोधनात केले जात होते ते आता प्रत्यक्ष वापरात आणण्याची वेळ आली आहे. डो ॲग्रोसायन्सेस बरोबर भागीदारीत हे तंत्र वापरून गव्हाची डीएस फॅरेडे ही नवी प्रजाती विकसित करण्यात आली आहे. 'डीएस फॅरेडे' ही जास्त प्रथिने असलेली गव्हाची प्रजाती असून, त्यामध्ये लवकर अंकुरण होते. या गव्हात काही जनुके समाविष्ट करण्यात आली असून, त्यामुळे ही प्रजाती जास्त ओलसर हवामानातही टिकते. ऑस्ट्रेलियात गेल्या चाळीस वर्षांपासून ही समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न सुरू होते. ॲमी वॉटसन यांनी याबाबतचे संशोधन केले असून, त्याची माहिती 'नेचर प्लँट्स' या नियतकालिकात देण्यात आली आहे.



## शून्याच्या शोधावर नवा प्रकाश

प्राचीन भारतीयांनी जगाला अनेक देणग्या दिलेल्या आहेत. त्यामध्ये गणितामधील काही मूलभूत गोष्टींचा समावेश होतो. शून्याची देणगीही त्यापैकीच एक आहे. शून्याचा शोध भारतात आपण मानतो त्यापेक्षाही आधीच्या काळात लागला होता, असे एका प्राचीन भारतीय हस्तलिखितावरून स्पष्ट झालेले आहे. हे हस्तलिखित तिसऱ्या शतकातील आहे. तेव्हापासून शून्याचा वापर सुरू होता, हे लक्षात आल्याने गणिताचा इतिहास ५०० वर्षांनी मागे सरकला आहे, असे ऑक्सफर्डच्या संशोधकांनी म्हटले आहे. आताच्या आपल्या कल्पनेपेक्षा किमान पाचशे वर्षे आधी भारतात शून्याचा शोध लागला होता.



बाखशाली हस्तलिखित हे १८८१ मध्ये भारतातील बाखशाली खेड्यातील एका शेतात सापडले होते. आता हे गाव पाकिस्तानात आहे, तर हे हस्तलिखित १९०२ पासून ब्रिटनच्या बोडलियन ग्रंथालयात आहे. ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या संशोधकांनी कार्बन डेटिंग तंत्राचा वापर करून बाखशाली हस्तलिखितानुसार शून्याचे मूळ फार जुने असल्याचे स्पष्ट केलेले आहे. हे हस्तलिखित तिसऱ्या किंवा चौथ्या शतकातील आहे. त्यात शून्याचा वापर केलेला आहे. बाखशाली हस्तलिखित हे ८ व्या व १२ व्या शतकातील असावे, असा आधीचा अंदाज होता; पण नवीन कार्बन डेटिंग तंत्राच्या मदतीने ते त्यापेक्षा जुने असल्याचे दिसून आले आहे. हे हस्तलिखित 'बिर्च बार्क'वर लिहिलेली ७० पाने असून, त्यात तीन वेगवेगळ्या शतकातील साधनांचा वापर केला आहे, त्यामुळे त्याचा काळ ठरवणे अवघड होते.

बोडलियन ग्रंथालयाचे रिचर्ड ओव्हेनडेन यांनी सांगितले, की बाखशाली हस्तलिखिताचा कालावधी निश्चित झाल्याने गणिताचा इतिहास आणखी जुना झाला आहे. बाखशाली हे गणितातील सर्वात जुने हस्तलिखित मानले जाते. मध्य प्रदेशातील ग्वाल्हेरच्या मंदिरातील भिंतीवर नवव्या शतकात शून्याचे चिन्ह कोरलेले दिसून आले होते. बाखशाली हस्तलिखितात जे बिंदू वापरले आहे ते शून्याचे निदर्शक आहेत. ऑक्सफर्ड विद्यापीठातील गणिताचे प्राध्यापक मार्कुस ड्यू सॉटॉय यांनी सांगितले की, शून्याची निर्मिती ही तिसऱ्या शतकापासून सुरु झाली. त्यावेळी भारतीयांनी ही कल्पना मांडली होती व नंतर ती आधुनिक जगाने उचलली. यामधून प्राचीन काळापासून भारतीय उपखंडात गणिताची प्रगती किती मूलभूत पातळीवरून होत गेली हे दिसून येते.

## मंगळ का पडला कोरडा?

आपल्या शेजारचा लाल ग्रह 'मंगळ' नेहमीच खगोलशास्त्रज्ञांसाठी कुतूहलाचा बनून राहिलेला आहे. या ग्रहावर एकेकाळी वाहते पाणी होते, नद्या-सरोवरे होती, हे आता सिद्ध झालेले आहे. मग हे पाणी गेले कुठे, असा प्रश्न पडतो. त्याची वेगवेगळी कारणे आहेत. त्यापैकी एक कारण म्हणजे तेथील खडकांनी स्पंजाप्रमाणे हे पाणी शोषून घेतले, हे असल्याचाही दावा काही संशोधकांनी केलेला आहे. मंगळाची सध्याची भूमी ओसाड, गोठलेली आणि जीवसृष्टीस प्रतिकूल आहे.



आतापर्यंतच्या संशोधनानुसार मंगळावरील पाणी हे मंगळाचे चुंबकीय क्षेत्र कमी झाल्याने वाफ बनून अंतराळात गेले. त्यावेळी ते एक तर सौरवातामुळे वाहून गेले असावे किंवा तेथील खालच्या स्तरांमधील खडकांत बर्फाच्या स्वरूपात अडकले असावे. पण, यामध्ये पाणी नेमके कुठे गेले याचे स्पष्टीकरण झालेले नाही. मंगळाच्या खनिजशास्त्रीय रचनेत याचे उत्तर असल्याचे ऑक्सफर्डच्या वैज्ञानिकांचे म्हणणे असून, त्यांनी प्रारूप पद्धतीने पृथ्वीवरील खडकांची रचना अभ्यासली व त्यावरून मंगळावरील खडकांमधून किती पाणी बाहेर निघू शकेल, याचा अंदाज घेतला. खडकांचे तापमान, दाब, मंगळाची घडण आणि अन्य मुद्द्यांचा यामध्ये विचार करण्यात आला. त्यामध्ये संशोधनांती असे सांगण्यात आले की, मंगळावर बेसॉल्ट खडक असून, त्यामध्ये पृथ्वीवरील खडकांपेक्षा २५ टक्के अधिक पाणी राहू शकते. त्यामुळे या खडकांनीच मंगळावरील पाणी आत ओढून घेतले असावे. अनेकांनी यावर मते मांडली; पण हे पाणी खडकांच्या अभिक्रियांमधून शोषले गेले असावे याचा विचार कुणी केला नव्हता, असे ऑक्सफर्डचे संशोधक जॉन वेड यांनी म्हटले आहे.

## मंगळावरील संकेतांचे गूढ उलगडणार?

जगभरात अनेक प्रकारच्या स्पर्धा होत असतात. अमेरिकेत अशीच एक वैज्ञानिक स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्यामध्ये एक अनोखा टास्क देण्यात आला होता. मंगळ ग्रहावरून आलेला रहस्यमयी सिग्नल डिकोड करण्याचा हा टास्क होता. युरोपियन स्पेस एजन्सीच्या 'एक्झोमार्स ट्रेस गॅस ऑर्बिटर' (टीजीओ) ने हा सिग्नल पृथ्वीवर पाठवला होता. आता अमेरिकन बाप-लेकीने हा सिग्नल डिकोड करण्याचा प्रयत्न केला आहे.

केन शॅफिन आणि केली शॅफिन अशी मेसेज डिकोड करणाऱ्या पिता आणि मुलीचे नाव आहे. सेटी संस्था, ग्रीन बँक वेधशाळा, इसा आणि इनाफ यांनी संयुक्तपणे नागरिक वैज्ञानिक स्पर्धा आयोजित केली. पृथ्वीवर असलेल्या तीन रेडिओ खगोलशास्त्र वेधशाळांनी हा सिग्नल कॅप्चर केला होता. जगभरातील पाच हजारांहून



अधिक नागरिक वैज्ञानिकांनी हा सिग्नल डिकोड करण्याच्या स्पर्धेत सहभाग घेतला होता. सर्वजण ऑनलाईनचे हे काम करत होते. अमेरिकेच्या केन आणि केली शॅफिन यांना सिग्नल डिकोड करण्यात यश आले आहे. या सिग्नलमध्ये पांढरे ठिपके आणि रेषांचे पाच गट दिसून येतात. काळ्या रंगाच्या पृष्ठभागावर हे पांढरे ठिपके आहेत.

या ठिपक्यांचा अर्थ म्हणजे पेशींच्या निर्मिती म्हणजेच जीवनाच्या निर्मितीकडे असा काढण्यात आला आहे. डिकोड केलेल्या संदेशात पाच अमिनो ॲसिड असतात, जे सजीवाच्या निर्मितीत महत्त्वाची भूमिका बजावतात. हे सर्व जैविक आण्विक आकृती आहेत. म्हणजेच जीवन देणाऱ्या अमिनो आम्लांचे आकृतीबंध आहेत, असे केन आणि केली यांनी सांगितले. या ब्लॉक्समध्ये ६, ७, ८ असे पिक्सेलचे अणुक्रम सापडतात. हायड्रोजन, कार्बन, नायट्रोजन आणि ऑक्सिजन असे आहे. या आकृत्यांमधील रेषा सिंगल आणि डबल बाँडस्पासून बनविल्या जातात. सामान्य अणू आकृतीप्रमाणे ठिपके त्यांना जोडण्याचे काम करतात, असे तर्क मांडले जात आहेत. मात्र, अद्याप या मेसेजचा पूर्ण अर्थ समजू शकलेला नाही.





लक्ष्मी रोड, पुणे येथील गांधी ज्वेलर्स (पाबळवाला) यांचे अहिल्यानगर येथील आयरिश प्रिमिअर हॉटेलच्या हॉलमध्ये ज्वेलरी प्रदर्शनाचे उद्‌घाटन करण्यात आले. (छाया – लहू दळवी)

# गांधी ज्वेलर्स (पाबळवाला) यांच्या ज्वेलरी प्रदर्शनाचे उद्‌घाटन

## २८ सप्टेंबरपर्यंत प्रदर्शन सर्वांसाठी राहणार खुले

GANDHI HOUSE OF JEWELS (PABALWALA)

नगर – अहिल्यानगरकरांनी उत्साहाने वाट पाहिलेले लक्ष्मी रोड, पुणे येथील गांधी ज्वेलर्स (पाबळवाला) यांचे अहिल्यानगर येथील आयरिश प्रिमिअर हॉटेलच्या हॉलमध्ये ज्वेलरी प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्‌घाटन २६ सप्टेंबर रोजी प्रमुख पाहुणे रिंकू फिरोदिया, मेघना मुनोत, मनीषा गुगले, वैशाली चोपडा, अलका बलदवा, श्रद्धा बिहानी, दीपा गुजरानी आणि अनीता सेठिया यांच्या हस्ते रिबीन कापून करून करण्यात आले.

यावेळी विशेष पाहुणे म्हणून समृद्धी कांकरिया कटारिया, जिज्ञासा मुनोत, नमिता फिरोदिया, वैशाली गांधी, अनीता विपुल सेठिया, आकांक्षा प्रतीक चोरडिया, शबनम धुप्पड, उज्वला लोढा व प्रेरणा अनिल कोठारी उपस्थित होत्या.

पहिल्याच दिवशी नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, डिझायनर ज्वेलरी आणि एक्सक्लुझिव्ह कलेक्शन या खास आकर्षणांनी उपस्थितांना भुरळ घातली. ब्रायडल, डायमंड आणि प्लॅटिनम कलेक्शनमधील नवे ट्रेंड्स ग्राहकांच्या पसंतीस उतरत आहेत, अशी माहिती आयोजकांनी दिली.

गेल्या दहा वर्षांपासून प्रदर्शनांच्या माध्यमातून गांधी ज्वेलर्सने निर्माण केलेला विश्वास, त्यांच्या गुणवत्तापूर्ण दागिन्यांमुळे व उत्कृष्ट सेवेमुळे ग्राहक अधिकाधिक संख्येने भेट देत आहेत. हे प्रदर्शन २६, २७ व २८ सप्टेंबर रोजीही सकाळी १० ते रात्री १० या वेळेत सुरू राहणार आहे.

शुद्धता, आकर्षक डिझाईन्स आणि खास ऑफर्स यांचा लाभ घेण्यासाठी अहिल्यानगरकरांनी या प्रदर्शनास नक्कीच भेट द्यावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# 'अंक' जीवनातील गणितेही सोडवितात

**डॉ.गोपाळकृष्ण रत्नपारखी**



श्रीराम ज्योतिष विद्यालयाने आयोजित केलेल्या अंकशास्त्र कार्यशाळेमध्ये बोलताना डॉ.गोपाळकृष्ण रत्नपारखी आदी.

नगर – शालेय अभ्यासक्रमात गणित सोडवताना जसे अंक उपयुक्त ठरतात तसे जीवनातील गणिते सोडवतानाही अंक महत्वपूर्ण कार्य करतात. आपल्या जगद् वंद्य भारतीय संस्कृतीत अंकशास्त्र हा अभ्यासाचा स्वतंत्र विषय त्यामुळेच आहे, असे प्रतिपादन रत्न–ज्योतिष व वास्तूशास्त्र अभ्यासक डॉ. गोपाळकृष्ण रत्नपारखी यांनी केले.

येथील श्रीराम ज्योतिष विद्यालयाने आयोजित केलेल्या अंकशास्त्र कार्यशाळेचे अध्यक्षस्थान भूषवताना ते बोलत होते. आचार्य प्रदिप पंडित यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यशाळेस प्रमुख पाहुणे म्हणून उद्योजक प्रविण उरणकर, हस्त सामुद्रिक ॲड.प्रफुल्ल कुलकर्णी व प्रसन्न भिडे उपस्थित होते. महाराष्ट्रभरामधून आलेल्या जिज्ञासूंनी या कार्यशाळेचा लाभ घेतला.

श्रीराम ज्योतिष विद्यालयाच्या प्राचार्या सौ.शितल देशमुख यांनी स्वागत व प्रास्ताविक करताना अंकशास्त्रावर कार्यशाळा आयोजित करण्याची भूमिका विशद केली. कार्यशाळेतील अध्यक्षांसह पाहुण्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

डॉ.रत्नपारखी यांनी जीवनातील अडचणी सोडविण्यासाठीही अंक सहाय्य करतात, हे अंकशास्त्राआधारे विविध उदाहरणे देऊन सांगितले. अंकशास्त्राचा अभ्यास ज्योतिष शास्त्रास पुरक आहे. सखोल अभ्यास आणि अभ्यासपूर्ण चिंतनाने आपण अचूक मार्गदर्शन करण्याचे सामाजिक कार्य सहजपणे करू शकतो, असा विश्वास व्यक्त केला.

प्रणित रत्नपारखी, संकेत वाधवणे, डॉ.शंतनू भयाणे आणि देविप्रसाद सोहणी यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यशाळेच्या उद् घाटन सोहळ्याचे सुरेख सूत्रसंचालन सेजल देशमुख यांनी केले. श्रीराम ज्योतिष विद्यालयातील विद्यार्थ्यांनी कार्यशाळा यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

विद्यालयाच्या प्राचार्या सौ.शितल देशमुख यांनी आभार मानताना अंकशास्त्र कार्यशाळेमधील मार्गदर्शन जिज्ञासूंना प्रभावीत करणारे ठरले, असे सांगितले.

# लता मंगेशकर यांच्या जयंतीनिमित्त २८ सप्टेंबर रोजी 'स्वरांजली' मैफल



वर्षा पंडित जितेंद्र भुरुक मिलिंद कुलकर्णी

नगर – गुरुमाऊली संगीत विद्यालयाच्या वतीने भारतरत्न स्वरसम्राज्ञी लतादीदी मंगेशकर त्यांना जयंतीनिमित्त 'मेरी आवाज ही पहचान है' या कार्यक्रमातून मराठी व हिंदी गाण्यांची स्वरांजली वाहण्यात येणार आहे. २८ सप्टेंबर रोजी संध्याकाळी ६:३० वाजता सावेडीच्या माऊली सभागृहात होणाऱ्या या कार्यक्रमात पुण्याचे गायक जितेंद्र भुरूक व गुरूमाऊली विद्यालयाच्या संचालिका वर्षा पंडित यांचे बहारदार गायन सादर होणार आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी विनामुल्य खुला आहे, अशी माहिती चंद्रकांत पंडीत यांनी दिली.

या कार्यक्रमात उद्योजक के.के.शेट्टी, शिल्पकार प्रमोद कांबळे व चित्रकार अनुराधा ठाकुर यांना त्यांच्या क्षेत्रातील अतुलनीय कार्याबद्दल सन्मानित केले जाणार आहे. तसेच या कार्यक्रमात पद्माकर वांजळे यांच्या 'पद्मरत्न' ह्या काव्य संग्रहाचे प्रकाशनही होणार आहे. पुण्याचे ज्येष्ठ निवेदक मिलिंद कुलकर्णी हे कार्यक्रमाचे निवेदन करणार असून नगरचे निवेदक प्रसाद बेडेकर हे कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करणार आहेत.

या मैफलीत गायकांना पुण्याचे चिन्मय कारेकर, अविनाश मातापूरकर व मुंबईचे अजितकुमार तसेच नगरचे अजित गुंदेचा, ललित भूमकर, दिलावर शेख व निलेश सोज्वळ हे साथसंगत करणार आहेत.

# इमाम-मोअज्जिन सन्मान हक्कासाठी संघटित लढ्याची घोषणा

## वक्फ विधेयकाला तीव्र विरोध, ३० सप्टेंबरला ओवेसींच्या उपस्थितीत बैठक



मुस्लिम समाजाच्या धार्मिक, सामाजिक व शैक्षणिक हक्कांच्या रक्षणासाठी संघटित लढा देण्याची घोषणा करण्यात आली आहे, यासंदर्भात घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत बोलताना ऑल इंडिया उलमा बोर्डचे अंजर अन्वर खान आदी.

नगर – मुस्लिम समाजाच्या धार्मिक, सामाजिक व शैक्षणिक हक्कांच्या रक्षणासाठी तसेच इमाम व मोअज्जिन यांना योग्य मान–सन्मान मिळावा या मागण्यांसाठी संघटित लढा देण्याची घोषणा करण्यात आली आहे. या संदर्भात ३० सप्टेंबर रोजी चेतना लॉन (औरंगाबाद रोड) येथे एमआयएम अध्यक्ष बॅ. असदुद्दीन ओवेसी यांच्या उपस्थितीत बैठक होणार आहे.

ऑल इंडिया उलमा बोर्डचे अंजर अन्वर खान यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. त्यांनी सांगितले की, इमाम व मोअज्जिन यांना शासकीय पातळीवर मान्यता, नियमित मानधन, आरोग्य विमा व निवृत्तीवेतन योजना लागू करणे आवश्यक आहे. त्यांना धार्मिक कर्मचाऱ्यांचा दर्जा देण्यात यावा, अशी मागणी बैठकीत करण्यात आली. त्याचबरोबर नव्या वक्फ विधेयकाला उपस्थितांनी तीव्र विरोध दर्शवला. या विधेयकामुळे वक्फ मालमत्तेवर शासकीय हस्तक्षेप वाढून धर्मस्वातंत्र्य धोक्यात येईल तसेच वक्फ बोर्डाचे स्वायतत्त्व बाधित होईल, असा इशारा देण्यात आला. त्यामुळे हे विधेयक तातडीने मागे घेण्याची मागणी करण्यात आली.

शैक्षणिक व सामाजिक हक्कांसाठी मुस्लिम विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनेची प्रभावी अंमलबजावणी, मदरशांच्या शिक्षणाचे आधुनिकीकरण, मुस्लिम महिलांसाठी व्यावसायिक प्रशिक्षण व रोजगाराच्या संधी वाढवणे, तसेच वक्फ मालमत्तेचे सर्वेक्षण व डिजिटल नोंदणी करून अतिक्रमणांवर कठोर कारवाई करण्यावर भर देण्यात आला.

अंजार खान म्हणाले की, या सर्व मागण्यांसाठी जिल्हानिहाय जनजागृती सभा, राज्यस्तरीय परिषद व आंदोलनात्मक कार्यक्रम राबवले जातील. समाजातील उलेमा, इमाम, युवक व महिला यांनी संघटित होऊन धोरणात्मक कृतीद्वारे हक्कांसाठी लढा देण्याची आवश्यकता आहे.

बैठकीला ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डचे कार्यकारी सदस्य हजरत मौलाना अबू तालिब रहमानी, एमआयएम महाराष्ट्र अध्यक्ष खासदार इम्तियाज जलील उपस्थित राहणार असल्याचे ऑल इंडिया उलमा बोर्डचे अंजर अन्वर खान यांनी माहिती दिली. यावेळी नियोजन समितिचे माजी नगरसेवक समद खान, खालिद शेख, समीर शेख, हाजी शैबाज, मौलाना गुलाम चिस्ती अशरफी, राजूभाई जहागीरदार, सनाउल्लाह तांबटकर आदि पदाधिकारी उपस्थित राहणार आहे.

# शहर अभियंत्यांच्या लेखी आश्वासनामुळे आत्मदहन आंदोलन स्थगित



महापालिकेसमोर आत्मदहन आंदोलन करण्याचा इशारा देणारे ड.सलीम रंगरेज यांना लेखी आश्वासन देताना महापालिकेचे शहर अभियंता मनोज पारखे, समवेत परिसरातील नागरिक.

नगर – शहरातील वॉर्ड क्र. १२ व १३मधील जीपीओ रस्त्यावरील साचलेले पाणी बाजूच्या गटार मधून वाहते केलेले आहे. तसेच या रस्त्याचे काम नव्या संकल्पनेवर आधारित करण्यात येत असल्याने भविष्यात हा प्रश्न पुन्हा उद्भवणार नाही असे लेखी आश्वासन महापालिकेच्या शहर अभियंत्यांनी दिल्यामुळे २६ सप्टेंबर रोजी करण्यात येणारे आत्मदहन आंदोलन स्थगित करण्यात आले आहे.

याबाबत ॲड.सलीम मोहम्मद शरीफ रंगरेज यांच्यासह नागरिकांनी या आंदोलनाचा इशारा दिला होता. त्यावर शहर अभियंता मनोज पारखे यांनी त्यांना लेखी आश्वासन दिले आहे. यात म्हंटले आहे की, जुने कलेक्टर ऑफिस रस्ता हा नव्याने संकल्पनेवर आधारित असल्या कारणामुळे रस्ता खोदते वेळेस त्या ठिकाणच्या भूमिगत गटार व पाण्याचे लाईन तुटलेले असल्यामुळे व त्यातील पाणी रस्त्यावर साचून राहिल्याने रस्त्याचे काम हाती घेता आले नाही. परंतु दरम्यानच्या काळात रस्ता बाजू गटर मधून पाणी वाहते करून त्या ठिकाणी वाहणारे पाणी बंद करण्यात आलेले आहे व रस्त्याचे काम हाती घेण्यात आले आहे . परंतु सदरचा रस्ता हा पूर्ण नव्या संकल्पनेवर आधारित असल्या कारणामुळे सध्या रस्ता वापरता येणार नसल्याने अन्य पर्यायी मार्गाचा वापर करण्यात यावा. असे या पत्रात म्हटले आहे. या शिवाय जुना मंगळवार बाजार येथे ड्रेनेज दुरुस्तीचे काम हाती घेऊन पूर्णपणे बंद केले आहे. सदरचे रस्त्यावरून पाणी वाहणार नाही याची दक्षता घेण्यात आलेली आहे. तसेच या ठिकाणी भूमिगत गटार पाईपचा व्यास कमी प्रमाणात असल्यामुळे ती वारंवार चोकअप होते. त्यामुळे त्या ठिकाणी मोठ्या व्यासाचे पाईप टाकणेची मागणी करण्यात आलेली असून काम सुरू प्रत्यक्ष सुरू होण्यास दोन दिवस लागणार आहेत व तोपर्यंत रस्त्यावरून वाहणारे सर्व घाण पाणी बंद करण्यात आलेले आहे. असे ही या पत्रात म्हटले आहे.

# नवरात्री आणि दिवाळी निमित्त ग्राहकांसाठी साईदीप हिरो ऑटोमोबाईल्सतर्फे विशेष ऑफर




नगर – साईदीप हिरो ऑटोमोबाईल्स तर्फे नवरात्री आणि दिवाळी निमित्त ग्राहकांसाठी विशेष ऑफर जाहीर करण्यात आली आहे.

या अंतर्गत हिरो टू व्हीलर खरेदी करणाऱ्या प्रत्येक ग्राहकाला गुडलाईफ स्क्रॅच कार्ड धमाका ऑफर अंतर्गत आकर्षक बक्षिसे जिंकण्याची संधी मिळणार आहे. ग्राहकांना रोजच्या ड्रॉमध्ये रोज एक टू व्हीलर, गोल्ड कॉइन, सिल्वर कॉइन किंवा OTT सब्स्क्रिप्शन जिंकण्याची संधी उपलब्ध आहे. म्हणजे प्रत्येक खरेदी सोबत हमखास बक्षीस मिळणारच आहे. याशिवाय भारत सरकारने जी.एस.टी प्रणालीत १०,% कमी केली आहे त्यामुळे ५००० ते १५००० पर्यंत वाहनांच्या किंमती कमी झाल्या आहेत. त्याशिवाय फ्लिपकार्ट वरून खरेदी केल्यास ₹५००० ते ₹१०००० पर्यंत डिस्काउंट मिळणार आहे. केवळ ₹१००० इतक्या डाउन पेमेंटमध्ये हिरो HF Deluxe, Splendor किंवा Destiny सारखी आवडती गाडी खरेदी करता येईल, याचा फायदा घेण्याचे आव्हान साईदिप ऑटोमोबाइल्स चे संचालक नीलेश चोपडा यांनी केले आहे.

अधिक माहितीसाठी: पत्ता: नगर–मनमाड रोड, सावेडी नाका, सावेडी, अहिल्यानगर संपर्क: ८९८३२९२९९९.

# अहिल्यानगर शहरामध्ये ४ ऑक्टोबर रोजी 'मराठा सोयरिक'चा १०० वा मोफत वधुवर मेळावा

नगर – मराठा सोयरिक संस्थेचा १०० वा मोफत मराठा वधुवर परिचय मेळावा नगर शहरात आयोजित करण्यात आला आहे. हा मेळावा ४ ऑक्टोबर रोजी दुपारी २ वाजता अहिल्यानगर शहरात रेल्वे स्टेशन जवळ, हॉटेल यश ग्रॅण्ड येथे होणार असल्याची माहिती जगदंब फाउंडेशनचे अध्यक्ष गणेश लंघे व मराठा सोयरिक संस्थेच्या संचालिका जयश्री कुटे यांनी दिली आहे. या मेळाव्यासाठी यश उद्योग समूहाचे संचालक रमाकांत (नाना) गाडे पाटील व माजी नगरसेवक योगीराज गाडे पाटील यांचे सहकार्य लाभत आहे. तसेच या मेळाव्यामध्ये संस्थेच्या अत्याधुनिक अशा मोबाईल ॲपचे उद्घाटन रीलस्टार सनी सकट व जान्हवी लटके यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

संस्थेने आतापर्यंत ९९ यशस्वी वधु वर मेळावे घेतले आहेत. हा १०० वा मेळावा आहे. या संस्थेकडून आत्तापर्यंत ४९०० लग्न जमून पार पडले आहेत. त्यापैकी ५६७ लग्न हे विधवा, विदुर घटस्फोटीत यांचे पार पडले आहे. धर्मादाय कार्यालयात नाव नोंदणी केलेली अशी शासन मान्य ही संस्था आहे. वेगवेगळ्या तालुक्यातील, जिल्ह्यातील सर्व क्षेत्रातील उच्चशिक्षित स्थळे या ठिकाणी बघायला मिळणार आहेत. आजकाल मुलांना लग्नासाठी लवकर मुली मिळत नाही, लग्न जमत नाही तसेच शेतकरी मुलांसोबत कोणी लग्न करायला तयार होत नाही. आपले नातेवाईक मित्रपरिवार यांनादेखील वेळ मिळत नसल्याने कोणीही स्थळ दाखवण्यात आता मदत करत नाही. म्हणून अशा वधू–वर मेळाव्यांची गरज पडत आहे.

वधू वर पालकांनी मोफत मराठा वधू वर मेळाव्याचे लाभ घेण्याचे आवाहन पारुनाथ ढोकळे, राजेंद्र पवार, सयाजी निमसे, गोरक्षनाथ पटारे, सोमनाथ जगताप, डी. जी. पाटील, शशिकांत भांबरे, राजाराम मुंगसे, संदीप गारकर, वसंत पाटील, नानासाहेब दानवे, मधुकर निकम, प्रमोद झावरे, मंदा कोतकर, प्रा.योगेश कोतकर, मोहन हेलकुटे, रमेश सावंत, उदय अनुभुले, अन्नपूर्णा ढम यांनी केले आहे.

या मेळाव्यासाठी वधू–वरांनी स्वतः दोन बायोडाटा, फोटो घेऊन पालकांसह यायचे आहे. माहितीसाठी ७४४७७८५९१० यावर संपर्क करण्याचे आवाहन संस्थेने केले आहे.

# 'श्रीरामकृष्ण'मध्ये रंगला विद्यार्थी पालकांचा गरबा




श्रीरामकृष्णमध्ये विद्यार्थी व पालकांसाठी गरब्याचे आयोजन करण्यात आले होते.

नगर – श्रीरामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशनच्या सेठ नंदलाल धूत इंग्लिश मीडियम स्कूल व मोहनलाल रामावतार मानधना ज्युनिअर कॉलेजमध्ये नवरात्रीच्या निमित्ताने विद्यार्थी व पालकांसाठी गरब्याचे आयोजन करण्यात आले होते. जुनिअर कॉलेजमधील विद्यार्थी व त्यांच्या माता पालक यामध्ये उत्साहाने सहभागी झाले.

या कार्यक्रमास सौ. रिटा नंदकुमार झंवर प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. विद्यार्थी व पालकांचे परीक्षण सौ. भक्ती प्रकाश गांधी व सौ. गीता उमेश गिल्डा यांनी केले. या कार्यक्रमास सौ. प्रतिभा श्रीगोपाल धूत उपस्थित होत्या. संस्थेचे उपाध्यक्ष व शाळा समितीचे चेअरमन नंदकुमार झंवर व उपाध्यक्ष मोहनलाल मानधना यांनी कार्यक्रमास उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

हा उपक्रम अपराईज ॲकॅडमीचे सी ए उमेश डोडेजा यांच्या सहकार्याने घेण्यात आला. परीक्षकांनी दिव्या राणे व जैनम मेहता या दोघांची उत्कृष्ट नृत्य तर माही डुंगरवळ या विद्यार्थिनीची उत्कृष्ट ड्रेपरी व कृपा पटेल व तिची आई यांची उत्कृष्ट जोडी म्हणून निवड केली. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन त्यांना गौरवण्यात आले. विद्यार्थी व पालकांनी सहभाग घेऊन कार्यक्रमाचा आनंद घेतला.

या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष श्रीगोपाल धूत, उपाध्यक्ष राजेश झंवर, सचिव डॉक्टर कोलते, सहसचिव बजरंग दरक व सर्व पदाधिकाऱ्यांनी शुभेच्छा दिल्या. संस्थेच्या मुख्याध्यापक उपमुख्याध्यापक समन्वय व शिक्षकांनी कार्यक्रमाच्या पूर्णत्वासाठी प्रयत्न केले. कार्यक्रमाचे संचलन श्रेयाकुमार गुंडू यांनी केले.

# आयुष्मान भारत व महात्मा फुले जन आरोग्य योजना समितीच्या विशेष निमंत्रित सदस्यपदी अमित धाडगे



नगर – आयुष्मान भारत व महात्मा फुले जन आरोग्य योजना समितीच्या विशेष निमंत्रित सदस्य पदी अमित महाराज धाडगे यांची निवड अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या सूचनेवरून अमित महाराज घाडगे यांची निवड झाली. या योजनेत महाराष्ट्रातील सर्व रेशन कार्डधारक आता लाभार्थी असणार आहेत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# राज्यकर निरीक्षक व सहायक कक्ष अधिकारीपदी सौरभ लांडे यांची निवड

नगर – महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेत सौरभ लांडे यांनी राज्यात सहाव्या क्रमांकाने यश संपादन केले. या यशामुळे त्यांची निवड राज्यकर निरीक्षक व सहायक कक्ष अधिकारी या पदांसाठी झाली आहे.

सौरभ लांडे यांचे शालेय व महाविद्यालयीन शिक्षण हे अहिल्यानगर येथेच झाले. पुढे त्यांनी छत्रपती संभाजीनगर येथील अभियांत्रिकी महाविद्यालयातून बी.ई. (इलेक्ट्रिकल) पदवी संपादन केली. शहरातील विभागीय डाकघरातील स्टेनोग्राफर शिवाजी लांडे यांचे चिरंजीव

या कामगिरीबद्दल पोस्टल संघटनेतर्फे सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला. यावेळी बोलताना पोस्टल संघटनेचे महाराष्ट्र व गोवा राज्याचे कार्याध्यक्ष संतोष यादव म्हणाले की, सौरभ यांनी स्पर्धा परीक्षेत मिळवलेले यश हे निश्चितच सर्वांसाठी अभिमानास्पद आहे. सत्कार प्रसंगी सचिन थोरवे, नामदेव डेंगळे, प्रदीप सूर्यवंशी, सुनील थोरात, शिवाजी लांडे, नंदा लांडे, प्रतिक तनपुरे, विलास कोतकरउपस्थित होते.



सौरभ लांडे यांच्या सत्कार प्रसंगी पोस्टल संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष संतोष यादव, सचिन थोरवे, नामदेव डेंगळे, सुनील थोरात, प्रदिप सूर्यवंशी व शिवाजी लांडे, नंदा लांडे आदी.

